CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### मनसेकडून मध्यरात्री ४९ जणांना एबी फॉर्म

**मुंबई :** राज्यात महापालिका निवडणुका तोंडावर येऊन ठेपली आहे. आज निवडणूक अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपली कंबर कसली आहे. मनसेने अत्यंत सावध पवित्रा घेत ५२ जागांवर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ३७ उमेदवारांची पहिली अधिकृत यादी जाहीर केली आहे. मात्र उर्वरित नावांबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री उशिरापर्यंत मनसेच्या ४९ संभाव्य उमेदवारांना निवडणूक अर्जांचे एबी फॉर्म वाटप करण्यात आले आहे. मनसेने आपल्या अने निष्ठावान कार्यकर्त्यांना मैदानात उतरवण्याची तयारी पूर्ण केली आहे. मात्र ही यादी अद्याप अधिकृतपणे प्रसारमाध्यमांसाठी जाहीर करण्यात आलेली नाही. मनसे या निवडणुकीत एकूण ५२ जागांवर आपले उमेदवार उतरवणार असल्याचे बोललं जात आहे. काल रात्री उशिरापर्यंत ४९ संभाव्य उमेदवारांना निवडणुकीचे अर्ज देण्यात आले आहेत.

### नाशिकमध्ये एबी फॉर्मवरून राडा

**नाशिक :** भाजप आमदार सीमा हिरें आणि भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या गाड्या फार्महाउसवर आल्या तेव्हा अनेक इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्ते त्यांची वाट पाहत उभे होते. अनेक उमेदवारांनी जबरदस्ती फार्महाउसवर घुसण्याचा प्रयत्न केला आणि त्यावर बराच राडा पाहायला मिळाला. अनेक इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडून दिलेल्या वागणुकीविषयी नाराजी व्यक्त केलीये. अनेकजणांनी फार्महाउसच्या दरवाज्यावर लाथा सुद्धा मारल्या. त्यामुळे वातावरण अधिकच तंग झाल्याचं पाहायला मिळालं.

### छत्रपती संभाजीनगरात मोठा ड्रामा

**छत्रपती संभाजीनगर :** भाजप कार्यकर्ते संतप्त झाले. तिकीट नाकारल्याने पदाधिकारी कार्यकर्ते आक्रमक झाले. हिंदू मतदारसंघ हिंदू लोक आणि तुम्ही अशा लोकांना हे करताय काय असा सवाल त्यांनी केला. आमच्यावर कोर्टाच्या केस आहेत. केसेस अंगावर घ्या. काल आलेल्यांना काही लोकांनी पैसे घेऊन तिकीट दिली. त्याचा मी निषेध करते. मी अपक्ष फॉर्म भरला आहे असे महिलांनी सांगितले.

### सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री; प्रकाश आंबेडकर

**पुणे :** पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती फिस्कटली. पुण्यातल्या पाटीलकीमुळे आमचे आणि काँग्रेसची फिस्कटल्याची माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली. पुण्यात वंचित बहुजन आघाडीला स्वबळावर जाण्याचा प्रकाश आंबेडकर यांनी आदेश दिला. मुंबईत आमच्या आणि काँग्रेसच्या युतीमुळे जर कोणी नाराज असेल तर आम्हाला काही देणंघेणं नाही. आमच्यासाठी तो पक्ष महत्त्वाचा आहे, नेते नाहीत असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. तर सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील असे भाकीतही आंबेडकर यांनी केले आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा भूकंप येणार का, शरद पवार धक्कातंत्र वापरणार का, अशी चर्चा आहे.

### राष्ट्रवादीचे ४० प्रभागात प्रत्येकी एक उमेदवार

**पुणे :** दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत असल्याने अजित पवारांची राष्ट्रवादी १२५ शरद पवारांची ४० जागा लढणार असून पॅनल निवडून येण्यास सोपे जाण्यासाठी अजित पवारांचे तीन उमेदवार आणि राष्ट्रवादी शरद पवारांचा एक उमेदवार प्रत्येक प्रभागात असणार आहे. राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी प्रत्येक प्रभागात राष्ट्रवादीची रणनीती असल्याचे बोलले जाते.

### लोह्यात शॉर्टसर्किटमुळे सात दुकाने खाक

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील लोहा शहरात भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली असून, यामध्ये सात दुकाने जळून खाक झाली आहेत. या दुर्घटनेत दुकानांमधील सामानाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे, मात्र आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### सप्तश्रृंग गडावर आता 'अहोरात्र' दर्शन

**नाशिक :** नाताळच्या सुट्ट्या, शाकंभरी नवरात्रोत्सव आणि सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाच्या स्वागतासाठी नाशिक जिल्ह्यातील शक्तिपीठ आणि ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी भाविकांचा ओघ वाढला आहे. ही तुडुंब गर्दी लक्षात घेता, प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी मंदिर दर्शनाच्या वेळेत मोठे बदल केले आहेत. कळवण तालुक्यातील श्रीक्षेत्र सप्तश्रृंगगड येथे दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना सुलभ आणि समाधानकारक दर्शन मिळावे, यासाठी देवस्थान प्रशासनाने मंदिर २४ तास खुले ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तर मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ ते रविवार, ४ जानेवारी २०२६. या पाच दिवसांच्या काळात मंदिर दर्शनासाठी एक क्षणही बंद होणार नाही.

# राज्यात १४ ठिकाणी भाजप-शिवसेनेची युती तुटली

**मुंबई :** राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांमुळे राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने सर्वच पक्षांमध्ये जोरदार हालचाली पाहायला मिळाल्या. काही इच्छुकांना पक्षाकडून उमेदवारी मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते, तर अनेक पदाधिकाऱ्यांना ऐनवेळी तिकीट नाकारण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी पक्षाशी दीर्घकाळ निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आल्याचा आरोप होत असून, काही ठिकाणी पक्षांतर करणाऱ्या 'आयाराम' नेत्यांना तिकीट देण्यात आल्याने अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे.



महायुतीमधील जागावाटपावरून भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी रस्सीखेच पाहायला मिळाली. काही महानगरपालिकांमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळत असल्याने पक्षाने आक्रमक भूमिका घेतली. तर काही ठिकाणी शिंदे गटाने युती करण्यास स्पष्ट नकार दिला. स्थानिक राजकीय गणिते आणि परिस्थिती लक्षात घेता दोन्ही पक्षांनी काही ठिकाणी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील एकूण १४ महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गटातील युती तुटली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या महापालिकांमध्ये दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे या शहरांमध्ये तिरंगी किंवा बहुरंगी लढती रंगण्याची शक्यता आहे.

जरी १४ ठिकाणी महायुती तुटली असली, तरी मुंबई आणि ठाण्यासारख्या राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गटामध्ये युती कायम ठेवण्यात आली आहे. मात्र या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना युतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे मुंबई आणि ठाण्यातील राजकीय समीकरणे वेगळी असणार आहेत.

दरम्यान, राज्यातील सर्व महानगरपालिका निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या महापालिका भाजप, शिंदे गट आणि ठाकरे गटासाठी प्रतिष्ठेच्या मानल्या जात आहेत. त्यामुळे जिथे युती कायम आहे आणि जिथे युती तुटली आहे, त्या दोन्ही ठिकाणी मतदारांचा कौल नेमका कुणाच्या बाजूने जाणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## पुणे महापालिकेत युती आघाडी फक्त कागदावरच

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करेपर्यंत भाज आणि शिवेसना यांच्यातील जागा वाटपाची चर्चा सुरुच राहिलेली. दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात आघाडी होणार असं नेत्यांनी सांगितलं तरी प्रत्यक्षात चित्र वेगळंच दिसायला मिळत आहे. पुण्यात भाजप विरुद्ध एकनाथ शिंदेंची शिवसेना विरुद्ध अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष विरुद्ध महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि वंचित असं चित्र आहे. म्हणजेच पुण्यात थेट दोन आघाड्यांमध्ये निवडणूक होणार नसून बहुरंगी लढती होणार आहेत.

**सर्व पक्ष रिंगणात उतरले, पुण्यात बहुरंगी लढतींचं चित्र**

पुणे महापालिकेच्या १६५ जागांच्या निवडणुकीत अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष एकत्र येणार अशा चर्चा रंगल्या होत्या. आमदार रोहित पवार यांनी देखील पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याचं सांगितलं होतं पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहे. मात्र, पुण्यात अजि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस किती जागा लढणार हे स्पष्ट झालेलं नाही. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुण्यात नक्की किती जागा लढवणार हे अंकुश काकडेंनी सांगितलेलं नाही. ७० पेक्षा अधिक ए बी फॉर्म वाटल्याचे काकडे म्हणालेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीत अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होणार आहेत.

## आम्ही काय नुसते झेंडेच लावायचे का?

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पक्षांनी युती करण्याचा निर्णय घेतला आहे. बंडखोरी टाळण्यासाठी आणि नाराजांची मातोश्रीबाहेर गर्दी होऊ नये यासाठी ज्यांची उमेदवारीसाठी निवड करण्यात आली आहे, अशांना मातोश्रीवर बोलावून फॉर्म देण्यात येत होते. मंगळवारी ठाकरेंच्या शिवसेनेतील नाराज शिवसैनिकांचे जत्थेच्या जत्थे मातोश्रीवर धडकण्यास सुरूवात झाली.

यावेळी ठाकरेंच्या शिवसैनिकांनी मनातील सल पहिल्यांदाच जाहीरपणे बोलून दाखवली. 'उद्धव ठाकरे यांनी आमच्याशी गद्दारी केली' असं म्हणत ठाकरेंच्या शिवसैनिकांनी आपला संताप व्यक्त केला. आजही एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबतच्या नेत्यांना ठाकरे पितापुत्र गद्दार म्हणूनच बोलावतात. त्याच ठाकरेंना त्यांच्याच पक्षाचे कार्यकर्ते आमच्याशी गद्दारी केल्याचे म्हणू लागल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते.

मुंबईच्या माजी महापौर श्रद्धा जाधव यांना प्रभाग क्रमांक २०२ मधून उमेदवारी




देण्यात आली आहे. त्यांनी आपल्या मुलाला म्हणजेच पवन जाधव याला उमेदवारी मिळावी यासाठी आग्रह धरला होता, त्यासाठी त्यांना सोमवारी मातोश्रीत ठिय्या मांडून बसावे लागले होते. मात्र उद्धव ठाकरे यांनी श्रद्धा जाधव यांना उमेदवारी देऊ केली. त्यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या भागातील शिवसैनिक प्रचंड संतापले आहेत.

एका शाखाप्रमुखाने म्हटले की, मी सामान्य शिवसैनिक आहे, ३६ वर्ष काम करतोय. आम्ही फक्त झेंडे लावायचे काम करायचे का? श्रद्धा जाधव शाखेचे इलेक्ट्रिसिटीचे बिल भरत नाही. मेन्टेनंस भरत नाही, शाखेत येत नाही. शाखा विकून

**ठाकरेंवर कार्यकर्ते भडकले; मातोश्रीबाहेर भयंकर मोठा ड्रामा**

खाल्ली त्यांनी तरीही त्यांना तिकीट का दिले? स्वत:ला तिकीट, नवऱ्याला तिकीट मुलाला तिकीट, सासऱ्याला तिकीट मग आम्ही जायचं कुठे?

याच वॉर्डातील एका महिला शिवसैनिकाने म्हटले की, ७ वेळा याच बाईला उमेदवारी देतात, आम्ही कट्टर शिवसैनिक आहोत; आमचे आयुष्य गेलं शिवसेनेसाठी. आमच्यासोबत गद्दारी केली. आम्ही पाय जळवतो तेव्हाच शिवसेना उमेदवार जिंकतो. हे उद्धव साहेबांना कळत नाही? तुमच्यासाठी श्रद्धा जाधव मोठी आहे, मग आम्ही काय चिंधी आहे का? असा जळजळीत प्रश्न कार्यकर्त्यांनी विचारला आहे.

## 'राष्ट्रवादी'ने तीन गुन्हेगारांनाही दिली उमेदवारी

**पुणे :** अजित पवारांनी जेलमध्ये हत्येच्या आरोपाखाली बंद असलेल्या उमेदवारांना तिकीट दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. अजित पवारांनी एक नव्हे तर तब्बल तिघांना एबी फॉर्म दिला आहे. आयुष कोमकरच्या हत्येच्या आरोपाखाली सध्या जेलमध्ये असणारं आंदेकर कुटुंब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात आहे.



नातवाच्या खुनाचा आरोप असलेल्या बंडू आंदेकर याने काही दिवसांपूर्वी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पोलिसांनी त्याला कडक सुरक्षाव्यवस्थेत आणलं होतं. घोषणाबाजी करत त्याने उमेदवारी अर्ज दाखल केला होता. यानंतर तो कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढणार याबद्दल उत्सुकता होती. नंतर तो अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढणार असल्याचं स्पष्ट झालं होतं. त्यानंतर आता लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांनाही राष्ट्रवादी काँग्रेसने एबी फॉर्म दिल्याचं समोर आलं आहे. अजित पवारांच्या पक्षाकडून हत्येच्या गुन्ह्यात तुरुंगात असलेल्या सोनाली आणि व लक्ष्मी आंदेकरला उमेदवारी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक २३ मधुन आंदेकर निवडणूक लढवणार आहेत. दोघीही तुरुंगातुन निवडणूक लढवणार आहेत.

लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना अजित पवारांच्या पक्षाकडून एबी फॉर्म देण्यात आला आहे. आंदेकरांच्या वकिलांच्या मार्फत हे फॉर्म भरण्यात आले. पुण्यातील भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

याशिवाय अजित पवारांनी गुंड गजा मारणेच्या पत्नीलाही उमेदवारी दिली आहे. पुण्यातील कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे यांना प्रभाग क्रमांक १०, बावधन येथून एबी फॉर्म देण्यात आला आहे. जयश्री मारणे राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवार असून त्यांनी उमेदवारी अर्जही दाखल केला आहे.

## मातोश्रीच्या अंगणात बंडखोरी, ठाकरे सेनेतून राजीनामा सत्र

*मुंबई : मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, 'मातोश्री'च्या अंगणातच राजीनामा सत्राला सुरुवात झाली असून, अनेक पदाधिकारी राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. वॉर्ड क्रमांक ९५ मध्ये पक्षाने हरी शास्त्री यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, स्थानिक शिवसैनिकांचा या उमेदवारीला तीव्र विरोध आहे. स्वर्गीय श्रीकांत सरमळकर यांचे जावई असलेल्या हरी शास्त्री यांच्या विरोधात शिवसैनिकांनी आपले राजीनामे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अनिल परब यांच्या निवासस्थानी आणले आहेत. याच वॉर्डमधील माजी नगरसेवक शेखर वायंगणकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. वायंगणकर हे अनिल परब यांचे कट्टर समर्थक मानले जातात. पक्षाने निष्ठावान कार्यकर्त्याला डावलून एसीमध्ये बसणाऱ्या किंवा करोडपती उमेदवाराला तिकीट दिल्याने त्यांची नाराजी स्पष्टपणे दिसून येते.*

## शिवडीत सिलेंडरचा स्फोट; कुटुंबाचे संसार उघड्यावर!

**मुंबई :** मुंबईत आज एका बाजूला महापालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने राजकीय वातावरण तापले आहे. सर्वच पक्षांचे दिग्गज नेते आणि कार्यकर्ते शक्तीप्रदर्शनात मग्न असतानाच, वडाळ्यातील शिवडी परिसरातून एक काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना समोर आली आहे. शिवडीच्या रेतीबंदर रोडवरील गुरुकृपा चाळीत गॅस सिलेंडरचे एकामागून एक ४ भीषण स्फोट झाले असून, या आगीत ५ ते ६ कुटुंबांचे संसार डोळ्यादेखत जळून खाक झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना आज दुपारी ३:१५ च्या सुमारास घडली. रेतीबंदर रोडवर असलेल्या गुरुकृपा चाळीतील एका बंद घरात अचानक शॉर्ट सर्किट झाले. घराला कुलूप असल्याने आगीची ठिणगी पडल्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. काही क्षणातच या आगीने घरातील लाकडी सामान आणि कापडांना विळखा घातला. आगीची धग वाढताच त्या घरातील गॅस सिलेंडरचा प्रचंड मोठा स्फोट झाला. हा आवाज इतका भीषण होता की, परिसरातील नागरिकांना सुरुवातीला भूकंप झाल्याचा भास झाला.

पहिल्या स्फोटानंतर आग वेगाने शेजारच्या घरांमध्ये पसरली. चाळीतील घरे एकमेकांना खेटून असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. दुर्दैवाने, आगीची झळ लागल्याने बाजूच्या घरांमध्ये असलेले आणखी तीन सिलेंडर एकामागून एक फुटले. स्फोटांच्या या मालिकेमुळे संपूर्ण गुरुकृपा चाळ धुराच्या लोटांनी वेढली गेली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्यांनी घटनास्थळी धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण परिसराचा विद्युत पुरवठा खंडित केला आहे.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक प्रशिक्षण कार्यक्रमास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** कलापंढरी संस्था लातूर व क्राय संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या बाल लैंगिक त्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामकृष्ण सम्मुखराव हे होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत माजी प्राचार्य माधव गादेकर ,केंद्रप्रमुख गौतम टाकळीकर, कला पंढरीचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी, मुख्य प्रशिक्षक म्हणून बाल न्याय मंडळाच्या सदस्या एड. छाया मलवाडे यांची उपस्थिती होती. यावेळी आपल्या मार्गदर्शनात प्राचार्य गादेकर यांनी निकोप समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी लैंगिक अत्याचार रोखणे आवश्यक असल्याचे सांगितले. आजचे बालक म्हणजे उद्याचा भारत घडवणारी भावी पिढी असतात. त्यांचे जीवन जेवढे सुरक्षित आणि प्रगतशिल राहील तेवढा दशा शाश्र्वत विकासाकडे वाटचाल करेल. परंतु बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना लक्षात घेता, बालकांचे जीवन आव्हानात्मक झाले आहे. हे अत्याचार अग्रक्रमाने रोखले जाणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# लातूर मनपावर भाजपचा झेंडा फडकणार : आ. निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत लातूरमध्ये ट्रिपल इंजिन सरकार येणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील काळात केलेल्या कामाच्या बळावर आम्ही मतदारांना सामोरे जाणार असून मनपावर भाजपाचा झेंडा फडकणार आहे, असा विश्र्वास माजीमंत्री आ.

संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला.

मनपा निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. ३०)अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता.लातूरमध्ये महायुती म्हणून लढण्यासंदर्भात



चर्चा सुरू होत्या. त्या अनुषंगाने माध्यमांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासकामे होत आहेत. त्यामुळे जनता भाजपाच्या पाठीशी आहे. महायुती संदर्भात विचारणा केली असता आ. निलंगेकर म्हणाले की, तिन्ही पक्षांमध्ये महायुती म्हणून लढण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तिघांनीही शेवटपर्यंत एकत्रित लढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. राष्ट्रवादीच्या नेत्यांचीही हीच भूमिका होती.स्वतंत्र लढू असे आम्ही कधीही म्हटले नाही. युतीसाठी बैठका घेतल्या, चर्चा केली. जागा वाटपाचीही चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडूनही नकार आला नाही परंतु राष्ट्रवादी मधील काँग्रेसच्या बी टीमने महायुतीत मिठाचा खडा टाकला. काँग्रेस स्वतःच्या बाजूने न खेळता विरोधकांच्या बाजूने खेळते.तोच प्रकार यावेळी घडल्याचे आ. निलंगेकर म्हणाले.

युतीसाठी शिवसेनेसोबतही सकारात्मक चर्चा झाली.अनेक प्रभागात भाजप व शिवसेनेमध्ये मैत्रीपूर्ण लढती होणार आहेत. रिपाई भाजपच्या सोबतच आहे,असे ते म्हणाले.

आ.निलंगेकर यांनी सांगितले की, उमेदवारांची यादी पक्षश्रेष्ठींनी फायनल केले आहे. आम्ही विकासाचे मुद्दे घेऊन जनतेपर्यंत जाणार आहोत.आम्ही आजपर्यंत काय कामे केली आणि पुढे काय करणार हे जनतेला पटवून सांगणार आहोत.ही लढाई निलंगेकर विरुद्ध देशमुख अशी नाही तर जनतेच्या हितासाठी, लातूरच्या हितासाठी आम्ही लढणार आहोत.या निवडणुकीत भाजपला ५० हून अधिक जागा मिळतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



## उपसरपंच ज्ञानोबा कांबळेंचा भाजपात प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर तालुक्यातील मौजे भाडगाव येथील उपसरपंच ज्ञानोबा निवृत्ती कांबळे यांनी लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन अनेक जण भारतीय जनता पार्टी प्रवेश करत आहेत. लातूर तालुक्यातील मौजे भाडगाव येथील उपसरपंच ज्ञानोबा निवृत्ती कांबळे यांच्यासह अनेकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष प्रताप पाटील, साहेबराव मुळे, पांडूरंग बालवाड, हणमंत गव्हाणे, आत्माराम जाधव यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## संस्काराच्या शिदोरीवर प्रत्येकजण जीवनात यशस्वी : डॉ. किनीकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** महाविद्यालयीन जीवनात मिळालेल्या संस्काराच्या शिदोरीमुळेच आजघडीला आपल्यापैकी प्रत्येकजण जीवनात यशस्वी होऊ शकले आहेत, असे प्रतिपादन सह्याद्री हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. हनुमंत किनीकर यांनी केले.

लातूरच्या मांजरा चॅरिटेबल ट्रस्टद्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय पाटील हे होते. यावेळी स्टार्ट क्लासेसचे संचालक राहुल सोनवणे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा.डॉ. पांडुरंग शितोळे, प्रा. दादासाहेब लोंढे, प्रा. हरिश्चन्द्र मोगरगे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. किनीकर यांनी सुशीलादेवी महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षणासोबतच आपल्याला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उपयोगी अतुलनीय अशी संस्काराची शिदोरी मिळाल्याचे सांगितले. या शिदोरीच्या बळावरच आज प्रत्येकजण समाजात प्रतिष्ठित नागरिक म्हणून जीवन व्यतीत करत आहेत. याठिकाणी आपल्या सर्वांना केवळ पुस्तकी शिक्षणच मिळाले आहे असे नसून जीवनात कोणत्या प्रसंगाचा सामना कशा पद्धतीने केला पाहिजे याचे धडेही मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लोंढे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या सोहळ्याच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. स्नेहमेळाव्यास २०० हुन अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी प्रा. मोगरगे यांनी आभार मानले.

## नववर्षानिमित्त मद्यविक्री कालावधीत शिथिलता

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** नववर्षानिमित्त राज्यातील एफएल-२, एफएल-३, सीएल-३, एफएलबीआर-२ व एफएल-४ व नमुना ई अनुज्ञप्त्यांच्या आस्थापना निर्धारित वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी उघड्या ठेवण्यास राज्य शासनाने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम १३९ (१) (सी) व कलम १४३(२) (एच१) अन्वये मंजुरी दिली आहे.

त्यानुसार लातूर जिल्ह्यातील किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या रात्री उशिरापर्यंत उघड्या ठेवण्यास मंजुरी देण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

## 'रामनाथ'चे प्राचार्य पी.सी.पाटील सेवानिवृत्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी श्री रामनाथ मा. व उच्च माध्यमिक विद्यालय आलमला येथील प्राचार्य पी.सी. पाटील हे आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले, त्यामुळे शाळेमध्ये त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. जी.एम. धाराशिवे यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष ॲड. उमाशंकर पाटील हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून आलमला केंद्राचे केंद्रप्रमुख भागवत जगताप, विस्तार अधिकारी हमीद शेख उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये वि.का सोसायटीचे चेअरमन विश्वनाथ बिराजदार, सुरेंद्र पो.पाटील, विश्वेश्वरय्या पॉलिटेक्निकचे प्राचार्य श्री प्रशांत धाराशिवे, सरपंच विकास वाघमारे, हे उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रजनन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सर्वच मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रभाकर कापसे यांनी केले, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अंबिका खिचडेंनी विचार मांडले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून विद्यालयातील सहशिक्षक डॉ. शरण धाराशिवे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर सत्कारमूर्ती संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजीराव




सेवानिवृत्त प्राचार्या सौ. अनिता पाटील यांचा संस्थेच्या व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी भागवत जगताप यांनीही पी.सी.पाटील सरांच्या कार्यावर प्रकाश टाकून त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ॲड. उमाशंकर पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. याप्रसंगी रामनाथ शिक्षण अंबुलगे, कोषाध्यक्ष चनबसप्पा निलंगेकर, संचालक मन्मथप्पा धाराशिवे, विरनाथ हुरदळे, शिवसांब हुरदळे, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला भगिनी, विद्यार्थी पालक, माजी विद्यार्थी, पाटील परिवारातील सदस्य, शाळेतील शिक्षक विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केशवराजमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात भारताचे पहिले कृषिमंत्री, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राम जोशी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती मीरा चामवाड, विज्ञान मंडळ प्रमुख श्रीमती प्रतिभा मोरे, कार्यक्रम प्रमुख विलास कुलकर्णी व विद्यार्थी सुदर्शन अमनावार यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर चि. सुदर्शन अमनावार या विद्यार्थ्याने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन श्रीमती प्रतिभा मोरे यांनी केले.

## युवा माहेश्वरी समाजाकडून ५०० गरम शालींचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** समाजातील गरजू घटकांच्या दुःखावर मायेची फुंकर घालण्याचे कार्य युवा माहेश्वरी समाज लातूरने पुन्हा एकदा करून दाखवले आहे. कडाक्याच्या थंडीने सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, उपचारासाठी रुग्णालयात दाखल असलेल्या गरीब रुग्णांच्या वेदना ओळखून युवा माहेश्वरी समाजाच्या युवकांनी माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

या सामाजिक उपक्रमावेळी युवा माहेश्वरी समाज संघटनेचे अध्यक्ष निकुंज भूतडा, सचिव ड. योगेश मालपाणी, तसेच देव भूतडा, देवेंद्र काबरा, ओंकार चरखा, कृष्णा सोनी, रितेश रांदड, केशव बियाणी, शिवम भूतडा, श्याम यादव, जोशी आदी पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून रुग्णांना प्रत्यक्ष पांघरून घालून त्यांना मानसिक आधार देत माणुसकीचा संदेश दिला.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, हीच खरी समाजसेवा आहे, अशी भावना यावेळी उपस्थित युवकांनी व्यक्त केली. युवा माहेश्वरी समाजाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, अनेक सामाजिक संघटनांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

## शिक्षण ही जीवनातील यशाची गुरुकिल्ली : डॉ. चिंते

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** शिक्षण ही जीवनातील यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी गावात शाळा नसल्याने शिक्षणाची दारे ठोठावावी लागायची. पण आता शाळा तुमची दारे ठोठावत आहे. विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घेऊन यशाची शिखरे गाठावी, असे आवाहन नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य तथा प्रसिध्द सर्जन डॉ. डी. एन. चिंते यांनी केले.

येथील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाचे 'कलाविष्कार २०२५-२६' वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवारी दगडोजीराव देशमुख सभागृहात पार पडले. त्यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी पंचायत समितीचे नोडल प्रमुख संतोष सूर्यवंशी व संजय क्षीरसागर, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, बाळासाहेब पाटील, तुळजाभवानी



शैक्षणिक संकुलाच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, राणी केंद्रे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता व तुळजाभवानी शैक्षणिक संकुलातील शिक्षक समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करतात. घरातून निघताना ते घड्याळ पाहतात, पण शाळेतून निघताना घड्याळ पाहत नाहीत. या संकुलात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येते. नियमित तासिकांसह जादा तासिकांचेही नियोजन करण्यात येते. येथील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकत आहेत, असे सांगून लातुरात 'एआय'ची पहिली कार्यशाळा या संकुलात होईल, असा विश्वास त्यांनी दिला.

इंडियन टॅलेंट ऑलंपियाडमध्ये बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड मिळाल्याबद्दल यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांनी पीपीटीच्या माध्यमातून संकुलाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा चढता आलेख उपस्थितांसमोर मांडला. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-१' स्पर्धेत तुळजाभवानी विद्यालयाने तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. येथील विद्यार्थी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर असून विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल कायम शंभर टक्के आल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलनात विद्यार्थ्यांनी समूह नृत्याबरोबर वैयक्तिक सादरीकरण गायन, नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, कथा-कथन, एकपात्री अभिनय सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. सूत्रसंचालन अलोक पाचेगावकर यांनी केले.




सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संभाजीनगर भाजपात तिकिटावरुन असंतोष

## सावे-कराडांच्या केबिनचा दरवाजा तोडला; पेट्रोल टाकून आत्मदहनाचे प्रयत्न




**छत्रपती संभाजीनगर, ३० डिसेंबर २०२५ :** महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपमध्ये तीव्र असंतोष उफाळून आला. उमेदवारी नाकारल्याच्या कारणावरून भाजपच्या महिला कार्यकर्त्या व इच्छुक उमेदवार दिव्या उल्हास मराठे यांनी पक्षाच्या प्रचार कार्यालयाबाहेर थेट आंदोलन करत अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.

उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने भाजप कार्यालयाबाहेर एबी फॉर्मसाठी मोठी गर्दी जमली होती. मात्र, अनेक इच्छुकांना पक्षाकडून उमेदवारी नाकारण्यात आली. यामुळे संतप्त झालेल्या दिव्या मराठे व काही कार्यकर्त्यांनी राज्याचे मंत्री अतुल सावे व केंद्रीय मंत्री भागवत कराड यांच्या केबिनचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करत कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला. यावेळी दिव्या मराठे यांनी सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल अंगावर ओतत आत्मदहनाचा प्रयत्न केला.

या घटनेनंतर भाजपमधील अंतर्गत नाराजी चव्हाट्यावर आली. दिव्या मराठे यांनी स्थानिक पक्षनेतृत्वावर गंभीर आरोप करत सांगितले की, गेल्या १८ वर्षांपासून त्या पक्षात सक्रिय असून पक्षासाठी १५ गुन्हे अंगावर घेतले आहेत. नगरसेवक असताना प्रभागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली, तरीही वारंवार तिकीट नाकारले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. काही कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवण्यासाठी नोकऱ्या सोडल्या असतानाही ऐनवेळी उमेदवार बदलल्याचा आरोपही करण्यात आला.

या प्रकारामुळे संभाजीनगर भाजपमध्ये उमेदवारीवरून मोठा स्फोट झाल्याचे स्पष्ट झाले असून, निवडणूक रणधुमाळीच्या पार्श्र्वभूमीवर पक्षासमोरील अंतर्गत व्यवस्थापनाचे आव्हान अधोरेखित झाले आहे.

# बिडकीनजवळ दुचाकी व हायवाची समोरासमोर धडक; तरुणाचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**

**बिडकीन दि. ३० डिसेंबर :** पैठण-छत्रपती संभाजीनगर रोडवरील सह्योगनगर, बिडकीन (ता. पैठण) येथे हायवा व दुचाकी यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात आज, दि. ३० डिसेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडला.

### एक गंभीर जखमी

या अपघातात विशाल भगवान राठोड (वय २२, रा. सह्योगनगर, बिडकीन, ता. पैठण) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीवरील दुसरा तरुण सचिन रुपसिंग जाधव (वय २१, रा. खंडाळे, ता. अहमदपूर, जि. लातूर) याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. सविस्तर माहिती अशी की, मिक्सर



हायवा (क्र. एमच.एच.-२०, ईजी-८०३३) ही गाडी बिडकीनकडून चितेगावच्या दिशेने जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकी (क्र. एम.एच- २०, जीएम- ७९५७) जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकीचा चक्काचूर झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज संस्था यांच्या रुग्णवाहिकेच्या सहाय्याने व नागरिकांच्या मदतीने अपघातग्रस्तांना ग्रामीण रुग्णालय, बिडकीन येथे दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. वेदपाठक यांनी तपासणी करून विशाल राठोड यांना मृत घोषित केले. जखमी सचिन जाधव याच्यावर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

या प्रकरणी मिक्सर हायवासह चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# कलाकारांचे नववर्ष स्वागत : कुटुंब, कृतज्ञता आणि सकारात्मक संकल्प

**छत्रपती संभाजीनगर, ३० डिसेंबर २०२५ :** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांमधील कलाकारांनी नववर्ष स्वागताच्या त्यांच्या योजनांबाबत भावनिक आणि प्रेरणादायी भूमिका मांडली आहे. 'घरवाली पेडवाली'मधील सावीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री सीरत कपूर यांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला आत्मपरीक्षण, कृतज्ञता व्यक्त करणे आणि आरोग्यकेंद्रित संकल्पांवर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. कुटुंबीय व जिवलग मैत्रिणींसोबत घरगुती गेट-टूगेदर, घरचे पदार्थ, खेळ आणि सकारात्मक वातावरणात नव्या वर्षाची सुरुवात करण्याचा त्यांचा मानस आहे.

'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश सिंगची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा यांनी कुटुंबकेंद्रित सेलिब्रेशनला प्राधान्य दिले आहे. बालपणीच्या आठवणी जपत, यंदाही टेरेसवर छोटेखानी समारंभ, संगीत, घरचे स्नॅक्स आणि आनंदी वातावरणात नववर्षाचे स्वागत करण्याची योजना त्यांनी सांगितली.

एकूणच, एण्ड टीव्ही कलाकारांसाठी नववर्ष म्हणजे कुटुंबीयांसोबत गुणवत्तापूर्ण वेळ, सकारात्मक ऊर्जा आणि नव्या उद्दिष्टांकडे वाटचाल करण्याची स्ट्रॅटेजिक सुरुवात आहे.

# कराडमध्ये २ जानेवारी रोजी बंधुता परिषद

**तभा वृत्तसेवा,**

**कराड, दि २९ डिसेंबर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ जानेवारी १९४० रोजी कराड येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भवानी शाखेस दिलेल्या ऐतिहासिक भेटीचे स्मरण जपण्यासाठी आणि त्यांनी दिलेला एकता, समता व बंधुतेचा संदेश समाजात अधिक प्रभावीपणे रुजावा या उद्देशाने कराड येथे बंधुता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद २ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता भवानी मैदान, पंतांचा कोट, सोमवार पेठ, कराड येथे संपन्न होणार आहे.

या बंधुता परिषदेसाठी विशेष अतिथी म्हणून छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे थेट वंशज आणि महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे प्रमुख वक्ते म्हणून भारत सरकारच्या मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांची विचारमंचावर विशेष उपस्थिती राहणार आहे.

या परिषदेमध्ये समाजातील वंचित, उपेक्षित घटकांसाठी कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या ऐतिहासिक आणि वैचारिक कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जैन आयटीआय नूतन इमारतीचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर, ३० डिसेंबर २०२५ :** पा. ब्र. आश्रम, कारंजा यांच्या वतीने संचालित श्री पार्श्र्वनाथ ब्रह्मचर्य आश्रम, वेरूळ येथील जैन गुरुकुलमध्ये १ जानेवारी २०२६ रोजी महत्त्वपूर्ण आणि बहुआयामी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या १५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या जैन आयटीआय प्रशिक्षण संस्थेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन तसेच परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परमशिष्य १०८ नियमसागर महाराज यांच्या अवतरण दिवसाचे औचित्य साधून हा भव्य धार्मिक व शैक्षणिक सोहळा संपन्न होणार आहे.

### वेरूळ येथे भव्य धार्मिक-शैक्षणिक सोहळा

या निमित्ताने विविध धार्मिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले असून जैन गुरुकुलमधील मानस्तंभावरील श्री पार्श्र्वनाथ भगवंताच्या प्रतिमेचा अभिषेक करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर राहणार असून मुंबई येथील नामवंत उद्योजक प्रशांत जैन उद्धाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. गंगापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब, कारंजा गुरुकुलाचे अध्यक्ष सतीश संगई, मुंबईचे अस्थिरोगतज्ञ डॉ. सुहास शहा, स्त्रीरोगतज्ञ डॉ. मोनिका शहा, उद्योजक विजय पाटणी व सौ. सुनंदा पाटणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.




कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता मानस्तंभावरील श्री पार्श्र्वनाथ भगवंताच्या महामस्तकाभिषेकाने होणार असून दुपारी २ वाजता जैन आयटीआय नूतन इमारतीचे उद्धाटन, तर दुपारी ३.३० वाजता परमपूज्य १०८ नियमसागर महाराज यांचे मांगलिक प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दिनेश गंगवाल, महामंत्री डॉ. प्रेमचंद पाटणी, प्रमुख मार्गदर्शक वर्धमान पांडे,

कोषाध्यक्ष सुमित ठोले, सहसचिव गौतम ठोले, शाळा समिती अध्यक्ष मदनलाल पांडे, सदस्य निर्मल कुमार ठोले, प्राचार्य विजय रणनवरे व मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर यांनी केले आहे. अशी माहिती अतुल बादे, नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

# इम्तियाज जलील यांना प्रदेशाध्यक्ष पदावरून हटविण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर, ३० डिसेंबर २०२५ :** ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षातील अंतर्गत असंतोष उघडपणे समोर आला असून, प्रदेशाध्यक्ष तथा खासदार इम्तियाज जलील यांना पदावरून हटविण्याची जोरदार मागणी पक्षातील कार्यकर्त्यांनी केली आहे. या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेत कार्यकर्त्यांनी शहरातील चौकामध्ये इम्तियाज जलील यांचा फोटो जाळून निषेध आंदोलन केले. या घटनेमुळे एमआयएममधील संघटनात्मक विस्कळीतपणा आणि नेतृत्वाविरोधातील नाराजी स्पष्टपणे अधोरेखित झाली आहे.

### कार्यकर्त्यांचा तीव्र निषेध; चौकात फोटो जाळून आंदोलन

आंदोलनात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, आरिफ हुसेनी हे एमआयएममधील सक्रिय आणि निष्ठावान कार्यकर्ते असूनही, महापालिका निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्यात आली नाही. तसेच, पक्षातील कार्यकर्ते नासिर सिद्दिकी यांनी एमआयएमकडून विधानसभा निवडणूक लढविली असताना, त्यांना इम्तियाज जलील यांनी गद्दार म्हणून संबोधल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या वक्तव्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

या वेळी नासेर सिद्दीकी, आरिफ हुसैनी, शेख अहमद, रफत यारखान, सोहैल पार्टी, भाई इम्तियाज, अय्यूब खान, जाफर बिल्डर, नुसरत खान, अबुलहसन हाशमी, साहिर खान,रफीक चिता आदी उपस्थित होते,

यावेळी कार्यकर्त्यांनी गंभीर आरोप करत, पक्षात उमेदवारीसाठी एबी फॉर्मची कथितपणे पैशाच्या मोबदल्यात विक्री होत असल्याचा दावा केला. या प्रकारामुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत असून, तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

कार्यकर्त्यांनी इशारा दिला की, पक्ष नेतृत्वाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन इम्तियाज जलील यांना प्रदेशाध्यक्ष पदावरून हटवावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

# आ. सत्तार यांच्या हस्ते भरडधान्य खरेदीचा शुभारंभ

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.३० डिसेंबर :** शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला हमीभाव मिळावा तसेच भरडधान्य पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आज आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते फर्दापूर ता. सोयगाव येथे खरीप पणन हंगाम २०२५-२६ शासकीय आधारभूत किंमत अंतर्गत भरडधान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. या खरेदी केंद्राचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे.

शुभारंभप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधला. भरडधान्ये ही आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून बदलत्या हवामान परिस्थितीत ही पिके कमी खर्चात उत्पादन देणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांसोबतच भरडधान्य शेतीकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले.या खरेदी केंद्रामार्फत मका, ज्वारी, बाजरी,आदी भरडधान्यांची थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येणार असून




त्याचा लाभ मध्यस्थांशिवाय थेट शेतकऱ्यांना मिळणार आहे, असा विश्वास आ. सत्तार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप राऊत, संचालक दारासिंग चव्हाण, माजी जि. प.सदस्य गोपीचंद जाधव जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, विलास वराडे, उस्मान खा पठाण,फिरोज खा पठाण, राधेश्याम जाधव, रंगनाथ वराडे, आली खा शब्बीर खा, भीमा बोराडे, शेख मुक्तार, शेख जाकेर, आरिफ शाह, अक्षय काळे, संतोष बोडके, कबीर शाह कुणाल राजपूत, हर्षल काळे, रईस खान, उस्मान खान शेर खा, विजय तायडे, वसंत चव्हाण, मकसूद कादरी, इरफान शेख, सुपडू पाटील, राजेश दिंडे, सय्यद अजीम, विनोद राठोड, शफिक पठाण, उमर पठाण, सय्यद फारुख, विश्वास पाटील आदिंसह शेतकरी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

३ रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर हिंगोली यांचे न्यायालयात, श्रीमती एस. एस. पळसुले, ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर हिंगोली यांच्या समक्ष,

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२९७/२०२५ निर्जला राजेश्र्वर भालेराव, वि. निरंक

अर्जदार : १) श्रीमती निर्जला राजेश्वर भालेराव, वय-४४ वर्षे, धंदा-घरकाम, २) चि. ओंकार राजेश्वर भालेराव वय-२२ वर्षे, धंदा-शिक्षण, ३) रोहित राजेश्वर भालेराव वय- १९ वर्षे, धंदा- शिक्षण, ४) श्रीमती कमलाबाई शेषराव भालेराव, वय-७० वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. जिजामाता नगर, हिंगोली, ता. जि. हिंगोली.

विरुध्द

गैरअर्जदार

निरंक.

विषय :बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या १८२७ च्या कलम २ व २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणे बाबत

हे की, विधीज्ञ श्री एन, एस. चव्हाण यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे करीता वरील अर्जदारांकडून या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. हे की, राजेश्वर शेषराव भालेराव, हे दि. २३/०५/२०२५ रोजी नांदेड येथे मयत झाले आहे. सदरील अर्जदार हेच मयताचे वारस आहेत. हे की, मयत राजेश्वर शेषराव भालेराव यांचे वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारसदार आहेत, त्यांच्याशिवाय इतर कोणीही त्यांचे कायदेशिर वारसदार नाहीत. अर्जदारांना मयताच्या नावे असलेला विज पुरवठा स्वतःचे करुन त्यावर सोलार बसविण्याकरिता व शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरील प्रकरण न्यायालयात दाखल केलेले आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, कोणास याबाबत काही म्हणणे किंवा आक्षेप हरकत दाखल करावयाची असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकीलामार्फत आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत दाखल करावा अन्यथा कोणताही आक्षेप या न्यायालयात मुदतीत न आल्यास योग्य तो निर्णय देण्यात येईल. आज रोजी दिनांक २४.१२.२०२५ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १३.०२.२०२६

आदेशान्वये,

सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली

प्रती, १) दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता. २) तहसिल कार्यालय हिंगोली यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता. ३) नगर परीषद कार्यालय हिंगोली, ता. जि. हिंगोली यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता. ४) मयत राजेश्वर शेषराव भालेराव जिजामाता नगर, हिंगोली, ता. जि. हिंगोली, घरावर डकविणे करिता

**सहायक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली**

**जाहीर प्रगटन**

**३ रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर हिंगोली यांचे न्यायालयात**

श्रीमती एस.एस. पळसुले, ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर हिंगोली यांच्या समक्ष.

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९६/२०२५ विजय शेषराव भालेराव, वि. निरंक

अर्जदार : १) विजय शेषराव भालेराव, वय-४६ वर्षे, धंदा- पत्रकार, २) गजानन शेषराव भालेराव वय-५३ वर्षे, धंदा- खाजगी नौकरी, ३) किशन शेषराव भालेराव वय-४३ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, ४) श्रीमती कमलाबाई शेषराव भालेराव, यय-७० वर्षे, धंदा घरकाम, ५) राजेश्वर शेषराव भालेराव (मयत) चे वारस, ५/१ श्रीमती निर्जला राजेश्वर भालेराव, वय-४४ वर्षे, धंदा- घरकाम, ५/२ चि. ओंकार राजेश्वर भालेराव वय-२२ वर्षे, धंदा- शिक्षण, ५/३ रोहित राजेश्वर भालेराव वय-१९ वर्षे, धंदा- शिक्षण., वरील सर्व रा. जिजामाता नगर, हिंगोली, ता. जि. हिंगोली.

विरुध्द

गैरअर्जदार

निरंक,

विषय : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या १८२७ च्या कलम २ व २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणे बाबत

हे की, विधीज्ञ श्री एन, एस. चव्हाण यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे करीता वरील अर्जदारांकडून या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. हे की, शेषराव किसनराव भालेराव, हे दि. १६/०९/२०१३ रोजी हिंगोली येथे मयत झाले आहे. सदरील अर्जदार हेच मयताचे वारस आहेत. हे की, मयत शेषराव किसनराव भालेराव यांचे वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारसदार आहेत, त्यांच्याशिवाय इतर कोणीही त्यांचे कायदेशिर वारसदार नाहीत. अर्जदारांना मयताच्या नावे असलेला विज पुरवठा स्वतःचे करुन त्यावर सोलार सविण्याकरिता व शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरील प्रकरण न्यायालयात दाखल केलेले आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, कोणास याबाबत काही म्हणणे किंवा आक्षेप हरकत दाखल करावयाची असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकीलामार्फत आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत दाखल करावा अन्यथा कोणताही आक्षेप या न्यायालयात मुदतीत न आल्यास योग्य तो निर्णय देण्यात येईल. आज रोजी दिनांक २४.१२.२०२५ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १३-०२-२०२६

प्रती,

प्रायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली

१) दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली यांचे नोटीस बोडांवर डकविणे करीता. २) तहसिल कार्यालय हिंगोली याचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता. ३) नगर परीषद कार्यालय हिंगोली, ता. जि. हिंगोली यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता. ४) मयत शेषराव किसनराव भालेराव जिजामाता नगर, हिंगोली, ता. जि. हिंगोली, घरावर डकविणे

**सहायक अधिक्षक**

**५ दिवाणी न्यायालय व. स्तर हिंगोली**

## थोडक्यात...

### ग्रामीण भागात पाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल फ्रॉस्ट अँड सुलिव्हनकडून सन्मान

**छत्रपती संभाजीनगर :** कोका-कोला इंडियाचा जल व्यवस्थापन उपक्रम प्रोजेक्ट जलधारा याला फ्रॉस्ट अँड सुलिव्हनच्या प्रोजेक्ट इव्हॅल्युएशन अँड रेकग्निशन प्रोग्राम (पीईआरपी) २०२५ अंतर्गत समुदाय विकास या श्रेणीत विजेता म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील पाणीटंचाई असलेल्या ग्रामीण भागात सुरक्षित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी या प्रकल्पाने केलेल्या प्रभावी आणि मोजता येणाऱ्या कामगिरीची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला आहे. हा सन्मान आनंदना - द कोका-कोला इंडिया फाऊंडेशन यांच्या शाश्र्वत जल व्यवस्थापनासाठी आणि समुदायाच्या सहभागातून राबवलेल्या उपक्रमांप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

### भारत इलेक्ट्रॉनिक्स यात्रेचा शुभारंभ केला

**पुणे :** उत्तर प्रदेश हे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले आहे. उत्तर प्रदेश सरकारचे माननीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री सुशील कुमार शर्मा यांनी मेस्से म्युंचेन इंडियाने आयोजित केलेल्या देशव्यापी उद्योग आणि खरेदीदार पोहोच मोहिमेला हिरवा झेंडा दाखवला. या मोहिमेचा उद्देश भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून राज्याचे स्थान मजबूत करणे आहे. ही यात्रा इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, पुरवठा साखळी आणि प्रादेशिक उद्योग सहभाग मजबूत करणे, प्रगतीशील धोरणे, मजबूत पायाभूत सुविधांद्वारे उद्योगाला पाठिंबा देणे आणि राज्यातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्लस्टर्स आणि केंद्रित प्रयत्नांद्वारे संपूर्ण मूल्य साखळीत गुंतवणूक आकर्षित करणे या राज्य सरकारच्या वचनबद्धतेचे प्रदर्शन करते.

### आयडीएफसी खाजगी बँकिंग ग्राहकांसाठी गज

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने गज: (संस्कृतमध्ये गज:) क्रेडिट कार्ड लॉन्च करण्याची घोषणा केली आहे. हे बँकेच्या ओळखीच्या उच्च-निव्वळ संपत्ती असलेल्या व्यक्तींसाठी (एचएनआय) डिझाइन केलेले प्रीमियम, केवळ आमंत्रणासाठी उपलब्ध असलेले धातूचे क्रेडिट कार्ड आहे. गज: क्रेडिट कार्ड हे अश्र्व-मयूर-गज: ट्रायलॉजीचा सर्वात मोठा भाग आहे, बँकेच्या प्रीमियम मेटल क्रेडिट कार्डच्या निवडक मालिकेत. आमचा विचार: संस्कृतमध्ये, गज: हत्ती हा वैभव, शहाणपण, स्थिरता आणि सर्वोच्च शक्ती दर्शवितो. प्राचीन भारतीय विचारसरणीत, हत्ती हा भूमीच्या वैभवाचा वाहक, साम्राज्यांचा रक्षक आणि मोजलेल्या शक्तीचे प्रतीक होता; कधीही उतावीळ, कधीही अतिरेकी नाही. राजाची महानता बहुतेकदा त्याने घातलेल्या मुकुटाने नव्हे तर तो ज्या हत्तीवर स्वार झाला त्या हत्तीने मोजली जात असे.

### 'टाटा सॉल्ट'ने गुणवत्तेचा नवा मापदंड निर्माण केला

**मुंबई :** टाटा सॉल्ट १९८३ मध्ये सादर झाले. भारताच्या आयोडिन कमतरता विकारावरील लढ्यात हे मीठ मोलाची भूमिका बजावत आहे. भारतातील पहिले राष्ट्रीय स्तरावर ब्रँडेड आयोडिनयुक्त मीठ असा लौकिक असणाऱ्या 'टाटा सॉल्ट'ने गुणवत्तेचा एक नवा मापदंड निर्माण केला आणि संपूर्ण देशभरातील घरांमध्ये सहज उपलब्ध झाले. आजही, टाटा सॉल्ट हे विश्र्वास, गुणवत्ता आणि निरोगी जीवनशैलीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. प्रत्येक कणामधून पोषण पोहोचवण्याच्या आपल्या प्रयत्नांद्वारे, टाटा सॉल्ट भारताच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि एक सशक्त राष्ट्र घडवण्यासाठी कार्यरत आहे.

### अक्षय पाटील यांचे पुनरागमन!

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' चाहत्यांचा आवडता पेलीच्या भूमिकेत अक्षय पाटील आपल्या पुनरागमनासह हास्याचा नवीन डोस घेऊन येण्यास सज्ज आहे, पण यावेळी तो पूर्णतः नवीन व अचंबित करणाऱ्या लुकमध्ये पाहायला मिळणार आहे. एकही शब्द न बोलता अधिक प्रभाव पाडण्यासाठी ओळखला जाणारा पेली गोंधळ व विनोदी स्थिती निर्माण करण्यासाठी परतला आहे, पण त्यामध्ये उत्साहवर्धक ट्विस्ट आहे, जो प्रेक्षकांना अचंबित करेल. पुन्हा भूमिका साकारण्याबाबत मत व्यक्त करत अक्षय पाटील म्हणाल्या, ''मला पूर्णतः नवीन लुकमध्ये पेलीची भूमिका साकारण्याचा आनंद होत आहे. मी नेहमी ही भूमिका साकारण्याचा आनंद घेतला आहे. सर्वांना माहित आहे की, पूर्वीचा पेली जास्त बोलायचा नाही आणि यावेळी देखील मी एकही शब्द बोलणार नाही. पण यामध्ये ट्विस्ट म्हणजे मी महिलेच्या वेषांतरामध्ये दिसणार आहे.

### जगभरातील प्रसिद्धीपासून ते भारतीय पडद्यापर्यंत

**मुंबई :** भारताची आघाडीची हिंदी जनरल एन्टरटेन्मेंट चॅनल सोनी सब घेऊन येत आहे 'हुई गुम यादें - एक डॉक्टर, दो जिंदगियां'. जगभरात वाखणल्या गेलेल्या डीओसी- नेल्ले तुई मनी या इटालियन मेडिकल ड्रामाचे हे अधिकृत भारतीय रूपांतर आहे. करुणा, चिवटपणा, मानवी आत्म्याचा विजय दर्शविणारे दमदार कथानक असलेल्या डीओसी या मालिकेचे पाच देशांत, तेथील स्थानिक भाषांमध्ये रूपांतर झाले असून जगभरात मालिकेची प्रशंसा झाली आहे. 'हुई गुम यादें - एक डॉक्टर, दो जिंदगियां'च्या रूपात सोनी सब वाहिनी भारतीय प्रेक्षकांसाठी एक प्रभावी कथानक घेऊन येत आहे.

### कवली येथे ब्लँकेट व हरिपाठ पुस्तक वाटप

**सोयगाव, ३० डिसेंबर २०२५ :** सोयगाव तालुक्यातील कवली येथे दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी मराठा प्रतिष्ठानच्या वतीने एक अत्यंत स्तुत्य व सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला. कवली गावात सुरू असलेल्या भागवत सप्ताहाच्या निमित्ताने मराठा प्रतिष्ठान सोयगाव तालुका तसेच मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमांतर्गत गावातील प्रत्येक कुटुंबासाठी 'हर घर हरिपाठ' या संकल्पनेचे साहित्य वाटप करण्यात आले. तसेच कडाक्याच्या थंडीच्या पार्श्वभूमीवर वयोवृद्ध ८०० नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम ह.भ.प.चंद्रकांत महाराज साक्रीकर, मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील, माजी सभापती चंद्रकांत पाटील, मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे, तालुकाध्यक्ष विजय चौधरी गलवाडा चे माजी सरंपच सुरेखाताई तायडे,घोसलाचे गणेश माळी, कवलीचे वसंत बनकर, उपसरपंच ज्योतीताई मंगेश पाटील, पोलीस पाटील निवृत्ती केंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी मराठा प्रतिष्ठानचे सदस्य रवी पाटील, दिनेश पाटील, योगेश पाटील, भीमराव पाटील, मनोज खोसे, अमोल पंडित, राहुल तराळ, श्रानेश्वर तराळ, युवराज पाटील, किशोर पाटील, प्रमोद वाघ, ज्ञानेश्वर युवरे, गणेश माळी,तिडका येथील मुजीफ पटेल, वाकडी येथील कृष्णा धुमाळ, उपलखेडा येथील गोपाल पाटील, सोनू तडवी, जरडीचे सचिन महाजन, सुनिल तिडके, चेतन पाटील आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल कवली गावातील नागरिकांनी मराठा प्रतिष्ठानचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

## अग्रलेख...

# परिवर्तनाचे पर्व!

काही गोष्टी योगायोगासारख्या असतात. वरवर पाहता त्यांचा एकमेकांशी संबंध दिसत नाही. पण त्यामागे लपलेले काही अदृश्य बिंदू जोडले की त्यातून तयार होणारे चित्र त्याचा अर्थ स्पष्ट करतात. राजकारणात तर अलिकडच्या काळात अशा विचित्र योगायोगांना बहरच आला आहे. जेमतेम पंधरावीस दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या एका वक्तव्याचे दुवे राजकारणाशी अशाच काहीशा अनपेक्षित प्रकारे जोडले जातील या योगायोगाची तेव्हा कोणी कल्पनाही केली नसेल. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांच्या स्वागत समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मेजवानीस काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी किंवा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्याऐवजी त्या पक्षाचे ज्येष्ठ खासदार शशी थरूर यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आल्याने काँग्रेस व केंद्र सरकारमधील वाद गाजत असतानाच पंतप्रधानांनी त्याच दरम्यान केलेले एक वक्तव्य अशाच एका योगायोगाचे मूळ ठरू पाहात असल्याचे ध्यानी येऊ लागले आहे. येत्या दहा वर्षांत गुलामगिरीची मानसिकता संपुष्टात आणू असा निर्धार त्यांनी व्यक्त केला, त्याच दरम्यान, काँग्रेसमध्ये सुरू झालेल्या वादावर स्वतः थरूर यांनीच निर्भीडपणे उत्तर दिले. या मेजवानीचे निमंत्रण आपल्याला मिळाले आहे आणि मी त्यास उपस्थित राहणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले, तेव्हा काँग्रेसच्या तंबूतील अनेकांच्या भुवया आश्चर्याने उंचावल्या होत्या. निमंत्रणाच्या मुद्यावरून एका बाजूला पक्ष केंद्र सरकारला धारेवर धरण्याची तयारी करत असताना त्याच पक्षाचा एक खासदार निर्भयपणे पक्षाच्या भूमिकेहून थेट वेगळी भूमिका घेतो हे स्पष्ट झाले, तेव्हा काही मोजक्यांच्या मनात तरी, मोदी यांच्या त्या वक्तव्यातून अप्रत्यक्षपणे उमटणाऱ्या वेगळ्या अर्थाचा उलगडा नक्कीच झाला असेल आणि मोदी यांनी ज्या गुलामगिरीचा उल्लेख केला तो संकेत काँग्रेसच्या दिशेने तर नसेल अशी शंकाही काहींच्या मनात नक्कीच आली असेल. काँग्रेसमध्ये गांधी घराण्याशी निष्ठा म्हणजेच पक्षनिष्ठा असे मानण्याची परंपरा पूर्वीपासूनच चालत आली आहे. 'इंदिरा इज इंडिया' हे स्तुतिस्तोत्र जेव्हा पहिल्यांदा गायिले गेले, तेव्हापासून हीच परंपरा जोपासली जात आहे. त्यामुळे आपल्या अशा देशभक्तीचे प्रदर्शन घडविण्याची संधी अनेक जण सातत्याने शोधत असताना, थरूर यांच्यासारख्या नेता मात्र त्याहून वेगळी भूमिका घेतो आणि परंपरेला छेद देतो, तेव्हा गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्ततेच्या मोदी यांच्या संकल्पाचा पहिला संकेत थेट काँग्रेसी मानसिकतेकडेच असावा याविषयी खात्रीदेखील पटू लागते. काँग्रेसमध्ये गेल्या सुमारे दहा-अकरा वर्षांत, विशेषतः राहुल गांधी हेच पक्षाचे सर्वेसर्वा नेते आहेत आणि त्यांच्या नेतृत्वास कोणत्याही प्रकारे आव्हान दिले जाणार नाही यासाठी पक्षांतर्गत पातळीवर काही निष्ठावंतांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असल्याने अनेक जण मूकपणे याकडे पाहात असले, तरी त्यांच्या मनातील अस्वस्थता मात्र लपून राहिलेली नाही. पहलगामवरील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताची भूमिका जगासमोर स्पष्ट करण्यासाठी विदेशात पाठविलेल्या शिष्टमंडळांपैकी एका शिष्टमंडळात शशी थरूर यांचा समावेश होता आणि या शिष्टमंडळाने अमेरिका, पनामा, ग्वायना, ब्राझील, कोलंबिया आदी देशांना भेट देऊन भारताची दहशतवादाविरोधातील भूमिका स्पष्ट केली होती. मात्र, याचे पडसाद काँग्रेसमध्ये उमटले आणि त्यातून पक्षांतर्गत मतभेदही उघड झाले. थरूर यांनी पक्षाची परवानगी न घेता शिष्टमंडळात सहभागी होण्यास संमती दिल्याचा आक्षेप घेत काँग्रेसच्या काही श्रेष्ठींनी नाराजीचा सूर लावला असला, तरी पक्षातीलच काहींनी मात्र त्यांच्या सहभागाचे राष्ट्रहिताची बाब म्हणत धीटपणाने समर्थनही केले होते. बहुधा, पक्षांतर्गत गांधीनिष्ठेच्या मानसिकतेतून बाहेर पडण्याच्या नव्या प्रक्रियेस येथे नवा प्रारंभ झाला असे म्हणता येईल.

आता त्या कुजबुजत्या सुरांना कंठ फुटू लागला आहे. असंख्य निवडणुकांत केवळ पराभवच पाहावा लागलेल्या राहुल गांधी यांच्या नेतृत्वाऐवजी प्रियांका गांधी यांना काँग्रेसच्या पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून पुढे आणण्याच्या मागणीचा कुजबुजता सूरदेखील आता उमटू लागला आहे, हा देखील कदाचित गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेचाच एक भाग असावा. काँग्रेसच्या १४० व्या स्थापना दिन सोहळ्याच्या काही तास अगोदर पक्षाचे सर्वांत निष्ठावंत मानले जाणारे नेते दिग्विजय सिंह यांनी पक्षाच्या नेतृत्वास झोंबणारी काही मते व्यक्त केली. दिग्विजय सिंह यांनी समाज माध्यमावरील एका टिप्पणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्काराची आणि पंतप्रधान मोदी यांच्या संघनिष्ठेची भरभरून प्रशंसा केली आणि थरूर यांच्यामुळे उद्‌भवलेल्या वादळापाठोपाठ नवे वादळ पक्षात घोंघावू लागले. दिग्विजय सिंह यांचे हे मत काँग्रेसच्या विचारसरणीविरोधात असल्याची टीका पक्षाचे अन्य अनेक नेते आता करत असले, तरी शशी थरूर यांच्यासारख्या नेत्याने मात्र त्यांच्या मताशी सहमतीदेखील दर्शविली आहे. दिग्विजय सिंह यांनी व्यक्त केलेले हे मत राहुल गांधी यांच्या भूमिकेशी संपूर्ण असहमती दर्शविणारे आहेच, पण राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची संघटनात्मक वाताहत होत असल्याची भावनाही व्यक्त करणारे आहे. त्यामुळे आता काँग्रेसमध्ये गुलामगिरीच्या परंपरेचे पाईक समजणारे घराणेशाहीचे निष्ठावंत आणि गलामगिरीची मानसिकता झुगारून थेट व्यक्त होण्याचे धाडस दाखविणारे पक्षाचे निष्ठावंत अशी दुफळी दिसू लागली आहे. कदाचित, दिग्विजय सिंह यांचे पक्षातील स्थान संथपणे संपुष्टात येण्याची प्रक्रिया येथून सुरू होईल आणि पक्ष पुन्हा आपल्या निष्ठेच्या परंपरागत वाटेवरून चालू लागेल, पण मानसिकतेत होणाऱ्या बदलाचे नवे रूप धारण केल्याचे चित्र मात्र आता लपविता येणार नाही. भाजपासारख्या पक्षातील एक सामान्य कार्यकर्ता पंतप्रधानपदापर्यंत पोहोचतो, ही संघाच्या शिस्तीची शक्ती आहे, असे मत दिग्विजय सिंह यांनी त्यांच्या समाज माध्यमावरील टिप्पणीतून व्यक्त केल्यानंतरही राहुल गांधी आणि दिग्विजय सिंह यांच्या योगायोगाने समोरासमोर झालेल्या भेटीतील राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून दिग्विजय सिंह यांच्याविषयीच्या नाराजीचा कडवट सूर उमटला. तुम्ही बदमाशी करत आहात, या शब्दांत राहुल गांधी यांनी त्यांना सुनावले. त्या वेळीच वातावरण काहीसे हलकेफुलके दिसत असले तरी त्यातून निष्ठावंतांना योग्य तो संदेश मिळाला आहे. गुलामी मानसिकतेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न सुमारे सहा वर्षांपूर्वी काही बंडखोरांनी केला होता. मात्र, त्या वेळी या बंडाचा बंदोबस्त करण्यात गांधीनिष्ठांना यश आले होते. मात्र, त्यानंतरही काँग्रेसमधील नाराजी खदखदत राहिली आहे, हे आता नव्याने स्पष्ट झाले आहे. भाजपामध्ये भाकरी फिरविण्याची पद्धत आहे, हे दिग्विजय सिंह यांचे मत थेट राहुल गांधी यांच्या नेतृत्वास आव्हान देणारे असल्याचे मानले जात आहे आणि त्यामुळेच आता दुफळीचे नवे परिणाम काँग्रेसमध्ये पाहावयास मिळणार आहेत. राहुल गांधींच्या राजकारणाचा देशातील जनतेवर कोणताही प्रभाव पडत नसल्याचे तर केव्हाच स्पष्ट झाले आहे. सातत्याने अदानी-अंबानी यांच्याविरोधात मोदी सरकारवर टीका करण्याच्या त्यांच्या भूमिकेतील हवा तर आता संथपणे काढली जात आहे. काँग्रेस आघाडीसोबत असल्याचे सांगणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाचे नेते शरद पवार यांनी बारामतीमधील एका प्रकल्पाच्या उद्‌घाटनास उद्योगपती गौतम अदानी यांना सन्मानपूर्वक निमंत्रित केले आणि संपूर्ण पवार परिवाराने अदानी यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. उभ्या देशाने हे दृश्य अनुभवल्याने, अदानी-अंबानीविरोधाच्या निमित्ताने राहुल गांधी यांनी मोदी सरकारच्या विरोधात सुरू केलेल्या प्रतिमाहनन मोहिमेची हवा काढून घेतली गेली आहे. भाजपाविरोधी आघाडीला काँग्रेसखेरीज पर्याय नाही असा गुलामी मानसिकतेचा समज पुसला जात असल्यानेच हे लक्षण आहे. गुलामगिरीची मानसिकता नष्ट करण्याच्या मोदी यांच्या संकल्पाची सुरुवात राजकारणापासून झाली आहे, असे स्पष्ट संकेत आता मिळू लागले आहेत. एका परीने हे राजकारणातीलही परिवर्तनाचे पर्व ठरेल. ▮

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेशातील हिंसेमुळे भारत चिंतेत

**प्रा. जयसिंग यादव**

बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान हे पाकिस्तानबाबत खूप कठोर होते. त्यांनी बांगलादेशला मान्यता न दिल्याबद्दल पाकिस्तानचे अध्यक्ष झुल्फिकार अली भुट्टो (नंतरचे पंतप्रधान) यांच्याशी बोलण्यासही नकार दिला. सुरुवातीला पाकिस्तानने बांगलादेशचे स्वातंत्र्य नाकारले; परंतु पाकिस्तानची भूमिका अचानक बदलली. फेब्रुवारी १९७४ मध्ये लाहोरमध्ये 'ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉन्फरन्स' शिखर परिषद झाली. त्या वेळी भुट्टो पंतप्रधान होते आणि त्यांनी मुजीबुर रहमान यांना औपचारिक निमंत्रण दिले. मुजीबुर रहमान यांनी सुरुवातीला उपस्थित राहण्यास नकार दिला; परंतु नंतर ते स्वीकारले. २२ फेब्रुवारी १९७४ रोजी पाकिस्तानने बांगलादेशला मान्यता दिली. भुट्टो यांनी 'ओआयसी' शिखर परिषदेतच ही मान्यता जाहीर केली होती. भुट्टो यांनी मान्यता जाहीर करताना म्हटले, की अल्लाहच्या फायद्यासाठी आणि या देशातील नागरिकांच्या वतीने आम्ही बांगलादेशला मान्यता जाहीर करतो. उद्या एक शिष्टमंडळ येईल आणि आम्ही ७० दशलक्ष मुस्लिमांच्या वतीने त्यांना आलिंगन देऊ. असे असूनही, दोन्ही देशांमधील संबंधांवरचा बर्फ पूर्णपणे वितळला नव्हता. आता ५२ वर्षांनंतर दोन्ही देशांमधील परिस्थिती बदलत असल्याचे दिसून येते. शेख हसीना यांना सत्तेवरून काढून टाकल्यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तानमधील ऐतिहासिक अंतर कमी होत आहे. या देशातील 'इन्किलाब मंच' या लोकप्रिय व्यासपीठाचे युवा नेते उस्मान हादी यांचा १८ डिसेंबर रोजी खून झाला. १२ डिसेंबर रोजी ढाका येथे अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यानंतर येथील एका हिंदू कामगाराची जमावाने निर्घृण हत्या केली. यामुळे भारत आणि बांगलादेशमधील तणाव इतका वाढला आहे, की दोन्ही देशांनी तात्पुरत्या व्हिसा सेवा निलंबित केल्या आहेत.

२० डिसेंबर रोजी 'पाकिस्तान जमात-ए-इस्लामी'चे अमीर सिराज-उल-हक यांनी इन्स्टाग्रामवर बांगलादेशच्या तरुणांचे कौतुक करणारी एक पोस्ट लिहिली. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की बांगलादेशच्या सुशिक्षित आणि धाडसी तरुण पिढीने अखंड भारताची कल्पना नष्ट केली आहे. भारत या प्रदेशात अस्थिरता निर्माण करत आहे. उस्मान हादीच्या हत्येनंतर, बांगलादेशमध्ये 'सोशल मीडिया'वर अफवा पसरल्या, की त्याचे मारेकरी सीमा ओलांडून भारतात आले आहेत. तथापि, बांगलादेश पोलिसांनी किंवा अंतरिम सरकारने अशा आरोपांना अधिकृत दुजोरा दिला नाही. तथापि, या अफवांचा दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांवरही परिणाम झाला. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या सरकारने



भारतीय दूतावासाला लक्ष्य केल्यामुळे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने १७ डिसेंबर रोजी म्हटले आहे की, बांगलादेशमधील अलिकडील काही घटनांबद्दल कट्टरपंथी घटकांचे खोटे दावे आम्ही पूर्णपणे नाकारतो. हे दुर्दैवी आहे की अंतरिम सरकारने या घटनांची सखोल चौकशी केलेली नाही किंवा त्यांच्याशी कोणताही संबंध स्थापित केलेला नाही. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये शेख हसीना यांना सत्ता सोडण्यास भाग पाडल्यापासून पाकिस्तान आणि बांगलादेशमधील संबंध सुधारत आहेत. पाकिस्तान आणि बांगलादेशमधील दरी हळूहळू कमी होत असल्याचे दर्शवणाऱ्या अनेक घडामोडी घडल्या आहेत.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये, १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धानंतर दोन्ही देशांमधील पहिला सागरी संपर्क स्थापित झाला. यापूर्वी दोन्ही देशांमधील सागरी व्यापार सिंगापूर किंवा कोलंबोमार्गे केला जात होता. बांगलादेशमधील पाकिस्तान उच्चायुक्त सय्यद अहमद मारूफ यांनी एका निवेदनात म्हटले, पाकिस्तानातील कराचीहून थेट बांगलादेशमधील चितगाव बंदरात मालवाहू जहाज पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे. ती द्विपक्षीय संबंधांमध्ये एक महत्त्वाचे पाऊल आहे. यापुढे पाकिस्तानमधील बांगलादेशी नागरिकांना मोफत व्हिसा जारी केला जाईल आणि ४८ तासांच्या आत निर्णय घेतला जाईल. हसीना यांना सत्तेवरून काढून टाकल्यानंतर 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' एक महत्त्वाची राजकीय शक्ती म्हणून उदयास येत असल्याचे दिसून येते. 'पाकिस्तान जमात-ए-इस्लामी' आणि 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' वैचारिकदृष्ट्या समान आहेत. दोघेही बांगलादेशच्या मुक्ती-युद्धावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' मुक्ती-युद्धातील भारताच्या भूमिकेपुढे प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. हसीना यांच्या जाण्यानंतर, बांगलादेशमधील मुक्ती-युद्धाच्या ऐतिहासिक वारशावरही हल्ले सुरू झाले. बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' युनूस यांच्या अंतरिम सरकारला पाठिंबा देत आहे.

फेब्रुवारीमध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी'चे प्रमुख शफीकूर रहमान म्हणाले होते की, १९७१ मध्ये आमची भूमिका तत्त्वावर आधारित होती. आम्हाला भारताच्या फायद्यासाठी स्वतंत्र देश नको होता. आम्हाला मतदानाचा अधिकार देण्यास पाकिस्तानला भाग पाडले जावे, अशी आमची इच्छा होती. आपण एखाद्याच्या माध्यमातून किंवा कोणाच्या वतीने स्वातंत्र्य मिळवले असते, तर ते एका ओझ्यापासून दुसऱ्या ओझ्यापर्यंत पोहोचण्यासारखे झाले असते. बांगलादेशच्या अंतरिम सरकारशी पाकिस्तानची वाढती जवळीक ही भारतासाठी गंभीर चिंतेची बाब असली पाहिजे. त्यापूर्वी भारतात घुसखोरी वाढवण्यासाठी बांगलादेशचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. आता ती परिस्थिती परत निर्माण होऊ शकते. युनूस सरकारने 'जमात-ए-इस्लामी' आणि इतर इस्लामी पक्षांना देशात मोकळीक दिली आहे. बांगलादेशमध्ये इस्लामवादी पक्षांना कधीही पाच टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळालेली नाहीत. सर्व पुरोगामी आणि उदारमतवादी पक्षांवर बंदी घालून आणि निवडणुका ताब्यात घेऊन, युनूस इस्लामी कट्टरपंथीयांना सत्तेत बसवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि बांगलादेशमधील तणावाचा फायदा पाकिस्तान आणि चीन घेत आहेत. बांगलादेशमध्ये पाकिस्तानचा सहभाग वाढतो आहे. या वर्षी जूनमध्ये चीनमधील कुनमिंग येथे चीनचे उपपरराष्ट्रमंत्री सन वेइडोंग आणि बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांमधील त्रिपक्षीय बैठकीने भारतासाठी चिंता निर्माण केली. त्यानंतर २०२४ च्या अखेरीस पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाने बांगलादेशच्या बंदराला अभूतपूर्व भेट दिली. चीन युनूस सरकारसोबत आपले संबंध सतत मजबूत करत आहे. कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी द्विपक्षीय संबंधांची सध्याची स्थिती भारतासाठी अत्यंत प्रतिकूल आहे. हा तणाव बांगलादेश आणि त्याच्या लोकांच्या हितांना धोका निर्माण करतो. यामुळे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे आणखी नुकसान होते. हा तणाव देशांतर्गत अपयश आणि अक्षमता लपवण्यास मदत करतो. म्हणूनच भारतासोबत बिघडणाऱ्या संबंधांमुळे बांगलादेशचेच जास्त नुकसान होईल, असे गृहीत धरणे ही एक गंभीर चूक ठरू शकते. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बालमृत्यूचे वाढते प्रमाण चिंताजनक

बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना राबविल्या जात असतानाही मृत्युदरात अपेक्षित घट होत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. माता-बाल आरोग्य योजना, पोषण अभियान आणि प्राथमिक आरोग्यसेवा असूनही अंमलबजावणीत असलेल्या त्रुटी, मनुष्यबळाची कमतरता आणि जनजागृतीअभावी बालमृत्यूंचे प्रमाण कायम असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण चिंताजनक असून हजार जन्मामागे १४० बालमृत्यू होत असल्याची माहिती समोर आली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार हे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. राज्यातील नवजात बालकांच्या मृत्युदराच्या तुलनेत जिल्ह्यातील प्रमाण कमी झाले आहे. बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येत आहेत. बालमृत्यूची आकडेवारी अंतर्मुख करणारी आहे. नवजात व पाच वर्षांखालील बालकांचा मृत्यू हा केवळ आरोग्य व्यवस्थेचे अपयश नाही तर सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय दुर्लक्षाचे भयावह वास्तव दर्शवते. कुपोषण, अपुरी आरोग्यसेवा, अशुद्ध पाणी, माता आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आणि गरिबी ही बालमृत्यूची मुख्य कारणे आजही कायम आहेत. शासकीय पातळीवर अनेक योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये आरोग्य सुविधा पोहोचण्यात अजूनही मोठी दरी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉक्टरांची कमतरता, औषधांचा तुटवडा आणि वेळेवर उपचार न मिळणे यामुळे अनेक निष्पाप जीव दगावतात. बालमृत्यू रोखण्यासाठी केवळ आकडेवारीवर चर्चा न करता ठोस कृतीची गरज आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेसमोर गंभीर चित्र उभे राहिले असून गेल्या एक वर्षात एकूण १७७ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अखत्यारीतील रुग्णालयांमध्ये २८, तर जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या अधीनस्थ रुग्णालयांमध्ये १४९ नवजात बालकांच्या मृत्यूची नोंद आहे. जिल्ह्यातील बालमृत्यूच्या आकडेवारीत १ ते पाच वर्षे वयोगटातील मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे चित्र समोर आले आहे. ही बाब चिंताजनक असून, बालकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे. माता व बाल आरोग्यसेवा मजबूत करणे, पोषण आहार योजनांची काटेकोर अंमलबजावणी, स्वच्छ पाणी व लसीकरणावर भर देणे अत्यावश्यक आहे. समाज, प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा यांनी एकत्रित जबाबदारी स्वीकारल्याशिवाय बालमृत्यू थांबणार नाही. राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत तब्बल १४,५२६ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. भाजपा आमदार स्नेहा दुबे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही आकडेवारी त्यांनी सादर केली. २०२२ ते २०२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये एकूण १४ हजार ५२६ मुलांचा मृत्यू झाला. यामध्ये नवजात शिशूपासून ते पाच वर्षांखालील मुलांचा समावेश असून सर्वच मुलांना सरकारी आरोग्य केंद्रांत उपचारासाठी दाखल केले होते. कुपोषणामुळे झालेल्या मृत्यूंचाही यात समावेश आहे. याशिवाय आदिवासीबहुल पालघर जिल्ह्यात १३८ नवजातांचा मृत्यू झाला. नियमित आरोग्य तपासणी, गर्भवतींसाठी अमृत आहार योजना, पोषण अभियान, मातृ वंदना योजना तसेच सुपोषित महाराष्ट्र उपक्रम या योजनांद्वारे कुपोषण कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. विधान परिषदेत आ. उमा खापरे यांनी बालमृत्यूचा मुद्दा मांडला. उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी विशेष कृती पथक तयार करण्यात येईल, असे सांगितले. परंतु आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे. माता-बाल आरोग्य सेवांवर लक्ष देण्याची गरज आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# व्यवसायातील महत्त्वपूर्ण मानवीय पैलू

**दत्तात्रेय आंबुलकर**

सद्यःस्थितीत व्यावसायिक क्षेत्रात सर्वसाधारणपणे भर दिला जातो, तो तंत्रज्ञान विकास, नवीन कार्यपद्धतींसाठी आधुनिक तंत्राचा वापर करून स्पर्धेत केवळ टिकूनच न राहता, स्पर्धेवर मात करून अधिकाधिक व्यवसाय-विस्तार व वाढता फायदा मिळविण्यावर. या प्रयत्नांतून आपल्या उद्योग व उद्योजकांनी रोबोटपासून युनिकॉर्नपर्यंतची विविध उद्दिष्टे तर साध्य केली. मात्र, या यशाचा टप्पा गाठताना आपण या प्रयत्नांशी निगडित व महत्त्वाच्या अशा मानवीय पैलूंचा कसा आणि कितपत विचार केला, हा प्रश्न अनेक ठिकाणी उपस्थित झाला आहे.

वाढत्या व्यावसायिक स्पर्धेच्या पृष्ठभूमीवर एक प्रभावी उपाय म्हणून अद्ययावत तंत्रज्ञान व विकसित संगणकीय कार्यपद्धती यावर आधारित उद्योग-व्यवसाय प्रक्रियेवर भर देतानाच, अनेक ठिकाणी कंपनी आणि कामकाजावर भर देताना, कर्मचारी या तेवढ्याच महत्त्वाच्या बिंदूवर प्रसंगी दुर्लक्ष होते का? हा महत्त्वपूर्ण प्रश्न यानिमित्ताने उद्योग-व्यवसाय क्षेत्रात निर्माण होतो. त्यातही व्यावसायिकांसंदर्भात मानवीय मुद्दा म्हणून कर्मचाऱ्यांना हाताळताना अथवा त्यांच्याशी संबंधित छोट्या-मोठ्या मुद्यांचा विचार करून निर्णय घेताना भावनात्मक पैलू बाजूला सारला जाण्याची उदाहरणे बहुसंख्य ठिकाणी घडत असतात. परिणामी, उद्योग-व्यवसाय व त्यातील प्रगतीसाठी कर्मचाऱ्यांशी भावनिक पद्धतीने व परिस्थितीनुरूप वागण्याची पद्धत व्यवस्थापन आणि व्यवस्थापक या उभयतांकडून दुर्लक्षिली जात आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रात व व्यवस्थापन कार्यपद्धतीच्या संदर्भात व्यवस्थापकीय संकल्पनेला अधिक प्रभावी व उपयुक्त सिद्ध करण्यासाठी व्यवस्थापकीय शिस्तीला कर्मचाऱ्यांचे सामंजस्य व उभयतांमध्ये समान भावना असणे, प्रत्येक उद्योग-व्यवसायाच्या यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असते. उद्योग-व्यवसाय चक्रातील तंत्रज्ञान, व्यवसाय प्रक्रिया, संबंधित कार्यपद्धती, आर्थिक पाठबळ, व्यावसायिक वाढ, उत्पादन व सेवा यांचा दर्जा व व्यवसायाची गुणवत्ता या सर्व व प्रमुख कार्य-टप्प्यांमध्ये कर्मचारी हा एक समान मुद्दा असतोच असतो.

कंपनीच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील व व्यावहारिकच नव्हे, प्रत्यक्षात विविध बाबी स्वाभाविकपणे अनुभवायला येतात. यामध्ये प्रामुख्याने कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांची निवड, कामावर रुजू होणे, प्रत्यक्ष कामकाज, कामाचे वार्षिक नियोजन व अवलोकन, संबंधित कर्मचाऱ्याच्या कामाचा दर्जा व त्याचे होणारे व्यावहारिक-व्यावसायिक परिणाम, कर्मचाऱ्याच्या व्यक्तिगत क्षमतेचे कार्यक्षमतेत होणारे रूपांतर, व्यक्तीच्या कामाच्या परिणामांनुरूप त्यांची होणारी पदोन्नती व पगारवाढ, कंपनीतर्फे दिले जाणारे शिक्षण-प्रशिक्षण व कर्मचाऱ्यांच्या विकासात्मक स्वरूपात केले जाणारे प्रयत्न इ. चा समावेश असतो. ही प्रक्रिया कर्मचारी संबंधित आस्थापनेत कामावर असताना व त्यांच्या सेवाकाळात निरंतर चालू असते. म्हणूनच, विशेषतः एचआर-व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून याला 'कर्मचाऱ्याचे सेवाचक्र' - 'एम्प्लॉयी लाईफ सायकल' असे म्हटले जाते. यातील विविध टप्प्यांवर कंपनी आणि कर्मचाऱ्यांनी काय प्रयत्न केले व त्यांचा काय परिणाम झाला, याचा वेळोवेळी व नियोजनबद्ध पद्धतीने विचार करणे, परस्पर फायदेशीर ठरू शकते. याचाच एक भाग म्हणून कर्मचाऱ्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांचे नियोजन व व्यवस्थापन हे मुद्देसुद्धा महत्त्वाचे ठरतात. मुळातच कर्मचारी व त्यांच्याशी संबंधित विविध मुद्दे हे जिव्हाळ्याचे व प्रसंगी ज्वलंत ठरू शकतात. या बाबीचा उद्योग क्षेत्रात बरेचदा अनुभव येतो. यातूनच कंपनी-कर्मचाऱ्यांचे परस्पर दुराग्रह, शिस्तपालन, अपेक्षांची पूर्तता, नाराजी वा असंतोष व काहीवेळा कर्मचारी संघटनांची सक्रियता दिसून येते. या आणि अशाप्रकारच्या स्थिती-परिस्थितीचा अंदाज, मागोवा घेणे, त्यावर संवाद साधून उपाययोजना करणे, मुख्य व जिव्हाळ्याच्या मुद्यांचे निराकरण करणे, परस्पर संबंधांना सकारात्मकतेची जोड देणे इ. प्रकारची उपाययोजना कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त व कंपनीसाठी फायदेशीर ठरते. कंपनी-व्यवस्थापनात शिस्तपालन हा मुद्दा सर्वच स्तरांवर व विविध प्रकारे महत्त्वाचा ठरतो. या प्रयत्नांचा आधार केवळ अधिकार-भय वा पदभार न राखता, संवादावर आधारित शिस्त ठेवणे व्यवस्थापन कार्यपद्धतीत महत्त्वाचे ठरते. भीतिपोटी आलेली वा असणारी शिस्त व्यक्तीच्या भीतीप्रमाणेच अल्पकालीन ठरते. त्याचे प्रसंगी विपरीत परिणाम होतात. वरिष्ठ-कनिष्ठांमधील दैनंदिन कामाशी निगडित व आवश्यक असणारे संबंध बिघडू शकतात. याचा उलट परिणाम व्यक्ती व संस्था या उभयतांवर होत जातो. त्यावर कंपनी-कर्मचारी उभयतांनी परस्पर जबाबदारी ओळखून ती निरंतर पार पाडणे, यांसारख्या मुद्यावर व्यावहारिक उपचार करणे आवश्यक असते.

यादरम्यान, कंपनी-कर्मचारी व व्यवस्थापन-व्यवस्थापक यांच्यातील नेतृत्वगुणांचा बरेचदा कस लागतो. विशेषतः ज्या उद्योग-आस्थापनांमध्ये कामगार संघटना सक्रियपणे कार्यरत असते, त्याठिकाणी याचा प्रत्यय अधिक प्रकर्षाने येतो. या नेतृत्वाला प्रसंगानुरूप जबाबदारीची साथ देणे व उभयपक्षी आपापली जबाबदारी परस्परपूरक व उद्योगाच्या व्यापक हितासाठी विचारपूर्वक वापरणे महत्त्वाचे ठरते. यासाठी प्रामुख्याने प्रयत्नपूर्वक, प्रामाणिकपणे व दीर्घकालीन प्रयत्न मात्र आवश्यक आहेत.

कामाच्या ठिकाणी व्यक्तिगत स्तरावर कंपनी-कर्मचारी या उद्योग-व्यवसायातील महत्त्वपूर्ण व व्यक्तिगत व्यवहारांवर आधारित स्वरूपाचे काम करताना परस्पर भावनांची दखल घेत, विविध मुद्यांवर परस्पर जाणिवांसह काम करणे, सर्व संबंधितांसाठी महत्त्वाचे ठरते. व्यावसायिक संदर्भात परस्पर व्यवहारांच्या भावनात्मक साथीची नितांत व वाढती गरज व्यवस्थापन क्षेत्रात नव्यानेच अधोरेखित करण्यात आली असून, त्या दृष्टीने पुढील मुद्दे महत्त्वाचे व कंपनी-कर्मचारी या उभयतांसाठी उपयुक्त असल्याने नमूद केले आहेत.

**परस्पर भावनांची जाणीव** : व्यावसायिक व व्यवस्थापनपर संदर्भात होणारे विचार-व्यवहारांमधील मानवीय भावनांचा पडताळा घेणे.

**व्यक्तिगत भावनांची दखल** : परस्पर संपर्क, संवाद, निर्णय व त्यामागील संबंधित घटकांच्या-व्यक्तींच्या भावना व त्यांची पृष्ठभूमी जाणून घेणे.

**अडचणी समजून घेणे** : कंपनी, कंपनीचे कामकाजच नव्हे, तर त्या संदर्भातील परस्पर अडचणी समजून घेऊन त्यावर यथावत तोडगा काढणे.

**कंपनीची काळजी घेण्यासाठी कार्यक्षम कर्मचाऱ्यांना राखून ठेवणे** : कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर कंपनी-व्यवस्थापनाची कार्यक्षमता अवलंबून असते. त्यामुळे कंपनीसंदर्भात सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे कंपनीमध्ये कर्मचारी तर महत्त्वाचे असतातच. मात्र, कार्यक्षम कर्मचारी अधिक महत्त्वाचे असतात, हे तत्त्व व्यवस्थापन व व्यवस्थापकांनी कायमस्वरूपी लक्षात ठेवावे.

**नेतृत्व आणि प्रभावी निर्णय क्षमता** : व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापकांनी कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ म्हणून आपली नेतृत्व-निर्णयाची भूमिका पार पाडताना सातत्याने भावनाधीन होऊन निर्णय न घेता, भावनाशील बनून निर्णय घ्यावे. असे निर्णय प्रभावी ठरतात. यासंदर्भात थोडक्यात व महत्त्वाचे म्हणजे, व्यवस्थापन प्रक्रियेत व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी परस्परांना गरजेनुरूप आवश्यक असणारा 'पासवर्ड' समजण्याची मानसिकता कायमची 'डिलीट' करणेच उभयतांसाठी आवश्यक आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-८८

मंगळवार, ३० डिसेंबर २०२५

### अभिमानाने भारावुनि मन बाल युवक उठले

अभिमानाने भारावुनि मन, बाल युवक उठले
तयांनी क्रांति गीत गाइले ॥धृ॥

मृत आशांचे स्थंडिल विझले असे भासले परी धुमसले
रुद्राची वाजता पाउले या धरतीच्या कणाकणातुन
मृत्युंजय उठले ॥१॥

ज्वलंत अंतःकरणामधुनी समरदुंदुभी उठले गर्जुनी
रौद्र भयानक निनाद परिसुनि गर्वगीत मदमत्त शत्रुचे
ओठातच विरले ॥२॥

संघटनेच्या मंत्रामधल्या ऋचा धीर गंभीर गाइल्या
दिक्कालाला भेदुनि गेल्या दाहि दिशांतुन शत वदनांनी
प्रतिध्वनी उठले ॥३॥

या देशाचे वारस उठतिल स्वामित्वास्तव पुन्हा झुंजतिल
हसत हसत बलिदानहि करतिल सत्य कालचे स्वप्न आजचे
सत्य पुन्हा ठरले ॥४ ॥

### 'प्रवाशांच्या सेवेसाठी' ब्रीदवाक्य एमएसआरटीसीने पुसले काय?

'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन एस. टी. महामंडळ महाराष्ट्रभर आणि बाहेरच्या राज्यातून फिरते आहे. त्याची आता कीव करावीशी वाटू लागली आहे. रात्री जेव्हा प्रवासी किंवा वृद्ध मंडळी प्रवास करताना इच्छितस्थळी उतरण्याची विनंती वाहकांना करतात तेव्हा जवळजवळ ७० टक्के वाहक फेटाळून लावतात. बसचा नियोजित थांबा तिथे नसेलही पण त्या व्यतिरिक्त माणुसकी हे नाते सर्वस्वी तुटलेले दिसते. अनेक वेळा या प्रवाशांकडे अवजड सामानही असते. रात्री रिक्षा वगैरे वाहने मिळत नाहीत याचाही ही मंडळी विचार करीत नाहीत. परंतु याच मंडळातील वाहक-चालकांकरिता गाडी कुठेही थांबविण्याला मात्र विसरत नाहीत याची खंत वाटते. अनेक चालक त्यांच्याच केबिनमध्ये तंबाखू खाऊन थुंकताना आढळतात. हे किळसवाणे प्रकारही महामंडळ काही नियम करून थांबवू शकत नाही का? यासाठीच प्रवाशांच्या सेवेसाठी एस. टी. आता राहिली नसून केवळ मनमानी कारभारासाठी ठरत आहे याची अधिकारी, मंत्री, खासदार, आमदार दखल घेणार का? यात जे उत्तम वाहक-चालक आहेत त्यांची नावे सहजपणे खराब होतात याचेही दुःख वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### ३१ डिसेंबर आणि एकादशी

या वर्षी ३१ डिसेंबरला एकादशी आहे. एकादशी हा हिंदू धर्मातील आत्मसंयम, शुद्ध आहार-विहार आणि आध्यात्मिक साधनेसाठी पवित्र दिवस मानला जातो. अशा दिवशी मांसाहार, मद्यपान किंवा उथळ जल्लोष करणे हे आपल्या परंपरेशी सुसंगत नाही. इंग्रजी वर्ष बदलते ते फक्त कॅलेंडरवर; निसर्गात या काळात काहीही मूलभूत बदल होत नाहीत. त्यामुळे इंग्रजी वर्षाच्या स्वागतासाठी एका रात्रीचा दिखाऊ आनंद टाळल्याने आयुष्य थांबणार नाही किंवा कुठलेही नुकसान होणार नाही; उलट आत्मसंयमाने साजरा केलेला दिवस मनाला स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा देतो. आपल्या संस्कृतीत एकादशीसारखे पवित्र दिवस हे भोगासाठी नसून साधनेसाठी असतात. म्हणूनच, ३१ डिसेंबरला मद्य व मांसाहारापासून दूर राहून आपल्या संस्कृतीशी नाते दृढ करूया. या दिवशी साधेपणाने व्रतोपवास किंवा सात्त्विक आहार करून, जप-नामस्मरण करत श्रीहरीची भक्ती करूया.

**अनिकेत शेटे**/पुणे

### संगीत देव बाभळी आणि ज्येष्ठांची धडपड

या नाटकाबद्दल खूप ऐकले होते. वाचलेही होते. २७ तारखेला योग आला. थंडीत रात्रीचा प्रयोग आणि तोही हाऊसफुल बघून निर्माता प्रसाद कांबळी यांनी नागपूरकरांचे आभार मानले. आवलीच्या पायाला बाभळीचा काटा रुतल्यामुळे झालेली जखम लवकर भरून निघावी म्हणून पांडुरंगाने रुक्मिणीला तिच्या मदतीला पाठविले. त्या काळात आवली आणि रुक्मिणी यांच्यातील संवाद, पांडुरंगाप्रति भक्ती आदी प्रसंग नाट्यरूपात मांडण्यात दिग्दर्शक-लेखक प्राजक्त देशमुख यांनी कमाल केली आहे. सुमधुर नाट्यपदांमुळे नाटक बघताना मराठी संगीत नाटकांचे दिवस आठवले. जोशी, सदावर्ते या दोघींनी केलेला अभिनय अप्रतिम आहे. तशी पावती प्रेक्षकात उपस्थित असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. परंतु ऑनलाईन बुकिंग करूनही ३० नोव्हेंबर, २७ डिसेंबर या दोन्ही दिवशी प्रयोगाचे ऐनवेळी बार कोड स्कॅन करून प्रवेश करताना नाट्यरसिकांना त्यातल्यात्यात वृद्धांना जी धडपड करावी लागली तशी वेळ यापुढे येऊ नये असे आयोजकांना सांगणे आहे. ▮

**प्रीती प्रकाश देशपांडे**/९०७५३१२७५२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानूसार जबाबदारी)

# ‘ज्ञानदीप मेट्रो ब्रेन अबॅकस’ची राज्यस्तरीय परीक्षेत उत्तुंग भरारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ३० डिसेंबर :** चाकूर शहरातील ज्ञानदीप मेट्रो ब्रेन अबॅकस अकॅडमी सतत वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे कार्य करीत आहे.तसेच विद्यार्थ्यांची विविध परीक्षेची तयारी करून घेऊन सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील असते.त्याच अनुषंगाने लातूर येथे दि.२५ डिसेंबर रोजी मेट्रो ब्रेन एज्यूकेअर प्रा. लि.ने आयोजित केलेल्या नवव्या राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेमध्ये ज्ञानदीप अकॅडमीच्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत संपूर्ण भारत देशातून सुमारे १७५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## संचालक परमेश्वर ढगे यांचा ‘टॉप परफॉर्मन्स ऑफ द इयर’ने केला गौरव

अबॅकस मधील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानदीप अकॅडमीचे संचालक परमेश्वर ढगे यांना सलग चौथ्यांदा टॉप परफॉर्मन्स ऑफ द इयर २०२५ चा सन्मान देऊन गौरवण्यात आले. हा सन्मान चाकूर तालुक्यासाठी मोठा अभिमान असून



अकॅडमीच्या आराध्या बंडू आबंदे या विद्यार्थ्यींनीने-७ गटातून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला, सिध्दी विरभद्र गाडेकर या विद्यार्थ्यींनीने -६ गटातून राज्यात द्वितीय, संस्कृती सचिन जाधव ही विद्यार्थ्यींनी -५ गटातून राज्यात द्वितीय,स्वरूपा ज्ञानोबा मतलाकुटे ही विद्यार्थ्यींनी -३ गटातून राज्यात द्वितीय, आराध्या नारायण लोया ही विद्यार्थ्यींनी -४ गटातून राज्यात तृतीय अशा ५ विद्यार्थ्यांनी भारत देशातून प्रथम, द्वितीय, तृतीय येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. तसेच २० विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ 'चिव्हर अवॉर्ड' हा गौरव मिळवून यश संपादित केले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे व ज्ञानदीप अकॅडमीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक सुप्रसिद्ध सिने अभिनेते निखिल बने हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मेट्रो ब्रेन एज्यूकेअर प्रा लि.चे संचालक संतोष लोहारे हे होते. त्याचबरोबर मेट्रो ब्रेन कंपनीच्या संचालिका सीमा लोहारे यांचीही उपस्थिती होती.

सिने अभिनेते निखिल बने यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अबॅकसमुळे विद्यार्थी सहा मिनिटापेक्षा कमी वेळेत शंभर पेक्षा जास्त गणिते सोडवितात मुलांच्या गणीत सोडवण्याच्या वेगाचे आणि अचुक तेचे त्यांनी कौतुक केले. तसेच अबॅकस क्लासचे विद्यार्थी म्हणजे उज्वल भारताचे भविष्य आहे असा आवर्जून उल्लेख केला.तसेच अबॅकसच्या विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

# अंबिका कॉलनी परिसरात धाडसी चोरी; मुद्देमाल लंपास

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३० डिसेंबर :** अहमदपूर शहरातील अंबिका कॉलनी परिसरात दिवसाढवळ्या घरफोडीची एक मोठी घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी एका बंद घराचे कुलूप तोडून लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

याप्रकरणी गोपाळ मधुसूदन बजाज (वय ४०, रा. अंबिका कॉलनी) यांनी अहमदपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी बजाज हे व्यवसायाने खत दुकानदार असून, दि २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास त्यांचे घर बंद असताना चोरट्यांनी ही संधी साधली. अज्ञात चोरट्याने घराच्या कपाटाचे लॉक तोडून आत ठेवलेले चांदी व सोन्याचे दागिने असा लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले, पोलीस निरीक्षक विनोद मैत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक आनंद श्रीमंगल आणि पोलीस उपनिरीक्षक रवि बुरकूले यांच्यासह डिबी पथकाचे तानाजी आरदवाड, पोकॉ. बबन चपडे बिट, अमलदार पवार विनोद यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली.

तपासाला गती देण्यासाठी घटनास्थळी तातडीने फॉरेन्सिक टीम आणि फिंगरप्रिंट (ठसे) तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे आणि ठसे संकलित केले आहेत. अहमदपूर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार हे करत असून भरवस्तीत आणि दिवसा झालेल्या या मोठ्या चोरीमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

**आरोपींच्या मुसक्या लवकरच आवळू : पोनि. मेत्रेवार**

या घरफोडीच्या तपासाबाबत माहिती देताना पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार म्हणाले की, आम्ही परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत असून तपासासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. फॉरेन्सिक टीमने दिलेले पुरावे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील. आरोपींचा माग काढण्यासाठी सर्व तांत्रिक बाबींचा वापर केला जात असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल. नागरिकांनीही घर बंद करून जाताना शेजाऱ्यांना किंवा पोलिसांना कल्पना द्यावी आणि मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात.

# सिंदखेड तरुणाची आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील सिंदखेड येथील तरुण विष्णू वसंत जंगलबोणे वय २५ वर्षे यांनी सोमवार दिनांक २९ डिसेंबर



रोजी अनसरवाडा येथे मामाच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

निलंगा तालुक्यातील सिंदखेड येथील एका २५ वर्षीय तरुणाचे वडील व्यसनाधीन असल्यामुळे या मयत तरुणावर घर चालत होते. तो लागेल ते मोल मजुरीचे काम करून उपजीविका भागवत होता. त्याला एक बहीण असून त्यांचे लग्न झालेलं आहे. मयत तरुण हा आपल्या आई वडिलांसोबत सिंदखेड येथे राहत होता.

सोमवारी दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी अनसरवाडा येथील शेत शिवरातील मयत तरुणाचे मामा दत्तात्रय वाघमारे हे आपल्या शेतात सकाळी गेले असता आपला भाच्चाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ निलंगा पोलीसांना सदरील घटनेची माहिती दिली. महेताब जेवळे बिट अंमलदार व पोलीस अंमलदार भीमाशंकर भोसले यानी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळीचा पंचनामा करून प्रेत निलंगा येथे शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय पाठविले. शवविच्छेदन करून प्रेत अंत्यविधीसाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

# नगराध्यक्ष हलगरकरांनी स्वीकारला पदभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत थेट जनतेतून मोठ्या मताधिक्याच्या फरकाने विजयी झालेले संजयराज प्रमोद हलगरकर यांनी मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारण्यापूर्वी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सर्व भाजप नगरसेवक यांनी भाजपा संपर्क कार्यालयातून माजी खासदार श्रीमती रूपाताई पाटील निलंगेकर यांचा आशीर्वाद घेऊन व माजी आमदार कै. दिलीपभाऊ पाटील निलंगेकर यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर वाजत गाजत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, माजी मुख्यमंत्री कर्मयोगी कै. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून नगर परिषदेत प्रवेश केला.



पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्याकडून संजयराज प्रमोद हलगरकर यांनी नगराध्यक्षाचा पदभार स्वीकारला. निलंगा पालिकेच्या वतीने नवीन नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

पदभार स्वीकारताना औराद शहाजनी बाजार समितीचे सभापती नरसिंग बिरादार, निलंगा बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, दगडू सोळुंके, संजय दोरवे, शेषेराव ममाळे, भाजपचे तालुका अध्यक्ष कुमोद लोभे व शहराध्यक्ष रवी फुलारी, विनोद आर्य, सुधीर पाटील, सुमीत इन्नानी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते पालिकेचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर दैनिक सोलापूर तरुणभारत शी बोलताना नूतन नगराध्यक्ष संजयराज हलगरकर म्हणाले, भाजपचे नेते माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व भाजपचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांना विश्र्वासात घेऊन शहरातील जनतेच्या व पालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने निलंगा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे. शहरातील प्रलंबित असलेले विकास विकास कामे तातडीने मार्गे लावून नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास आपण प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगराध्यक्ष संजयराज हलगर यांनी नगराध्यक्षाचा पदभार स्वीकारल्यानंतर निलंगा शहरातील संगन बसव विरक्त मठाला भेट देऊन मताधिपतीचा आशीर्वाद घेतला. यावेळी संगन बसव मठाच्या परिसरात सुरू असलेल्या विविध विकास कामाची त्यांनी पाहणी केली. यावेळी मठाच्या वतीने संगन बसव महास्वामी यांनी नूतन नगराध्यक्षांचा सत्कार केला. यावेळी प्रकाश पटणे, शिवप्पा भुरके, राजप्पा सोरडे, भाजप शहराध्यक्ष रवी फुलारी, गुंडप्पा मंठाळे महेश षटकार रतन रेड्डी, इंजिनिअर श्रीमती ममाने मॅडम, पी.के. पाटील, फकीर मिस्त्री उपस्थित होते.

# संत तुकाराम लॉ कॉलेजच्या वतीने नीता मोरेंचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** साने गुरुजी यांच्या जयंतीचे औचित्य



साधून संत तुकाराम लॉ कॉलेज उदगीर व राजीव गांधी नर्सिंग कॉलेज उदगीरच्या वतीने नीता मोरे यांचा सत्कार कॉलेजचे प्राचार्य राजकुमार नावंदर, उदगीर न्यायालयाचे न्यायाधीश भालचंद्र झेंडे, त्यांच्या सुविद्य पत्नी सोनाली झेंडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दीपक बलसूरकर, महेशसिंह बयास यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

नीता मोरे यांचा हळवा कोपरा हा कथासंग्रह महाराष्ट्र शासनाने पूरक वाचन साहित्य म्हणून निवडला आहे. तसेच एस सी ई आर टी पुणे मार्फत नुकत्याच संपन्न झालेल्या शिक्षकांच्या कथाकथन स्पर्धेत तालुक्यात सर्वप्रथम क्रमांक व विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून राज्यस्तरावर निवड झाली आहे. पुढील स्पर्धे साठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी महाविद्यालयाचा सर्व स्टाफ, ॲड. महेश मळगे, ॲड. सागर बिरादार, ॲड. देवानंद नामवाड, जोशी, कानूरे, दंडिमे उपस्थित होते.

# डॉ. नारायण जाधव-डॉ.सौ. शितल जाधव यांना शिखर संमेलनाचे निमंत्रण

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** नवी दिल्ली येथे विश्व स्वास्थ्य संघटना व आयुष मंत्रालय, भारत सरकार द्वारा आयोजित. दुसऱ्या विश्व स्वास्थ्य संघटन पारंपारिक चिकित्सा पद्धतीच्या शिखर संमेलनात भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली अंतर्गत, मेडिकल असेसमेंट अंड रेटींग बोर्डाचे माजी अध्यक्ष तथा बोर्ड ऑफ इथिक्स अंड रजिस्ट्रेशन चे सदस्य, डॉ नारायण जाधव यांना व उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालय च्या द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. शितल जाधव-घोरबांड यांना या सम्मेलनात उपस्थित राहाण्यासाठी आंमत्रित करण्यात आले होते.

ह्या सम्मेलनाचे आयोजन विश्व स्वास्थ्य संघटना व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवस भारत मंडपम, दिल्ली येथे करण्यात आले होते. याचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याच्या समारोप प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी व विश्व स्वास्थ्य संघटनेचे महानिर्देशक डॉ. टेड्रास अधनान उपस्थित होते. या सम्मेलनात. यामध्ये विविध ११० देशांतील पारंपारिक चिकित्सा पद्धतीच्या विशेषतज्ज्ञांनी भाग घेतला होता. या तीन दिवसा मध्ये विविध विषयांवर विचार मंथन करण्यात आले. १०० हून अधिक देशांमधील प्रतिनिधींनी या भव्य आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता दिल्लीला भेट दिली. हा जागतिक स्तरावरील समिट आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.



# निलंगा पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा शहरात एका अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने टेम्पोतून नेवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी निलंगा पोलिस ठाण्यात आरोपी विरुध्द पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

निलंगा शहरातील एका वस्तीच्या परिसरात अल्पवयीन मुलगी बहिणीचे कपडे आणण्यासाठी जात होती. दरम्यान टेम्पो घेवून आलेल्या आरोपीने सदर मुलीला जबरदस्तीने गाडीत घेतले. मुलीच्या घरी नेवून सोडले. घरात कोणीही नसल्याने पाणी देण्याचा बहाणा करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली, अशी फिर्याद पीडित अल्पवयीन मुलीने दिल्यावरून आरोपी योगेश खोमणे (वय २२) याच्या विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल धुमे करीत आहेत.

# विद्यार्थ्यांनी कामातून आपली ओळख निर्माण करावी : भार्गवी चिरमुले

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** विद्यार्थ्यांनी दिसण्यातून नव्हे तर कामातून आपली ओळख निर्माण करावी. सामाजिक माध्यमांमुळे आज शहर-ग्रामीण अशी भिंत पूर्णपणे कोसळली असून संवादाच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत, असे प्रतिपादन वार्षिक स्नेहसंमेलन ‘उदयोत्सव २०२५-२६’ च्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर हे होते. यावेळी व्यासपीठावर म. ए. सोसायटीचे उपाध्यक्ष ड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष माधवराव नौबदे, तसेच सदस्य डॉ. श्रीकांत मध्वरे, आडेप्पा अंजुरे, शिवराज वल्लापुरे, भीमाशंकर मुद्दा, भरत पस्तापुरे, दिलीप चौधरी, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. शिवशंकर हल्लाळे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी डॉ. सुरेश लांडगे,



विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना भार्गवी चिरमुले म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी केवळ भाषण ऐकण्यापेक्षा प्रश्न विचारावेत, संवाद साधावा आणि करिअरविषयीच्या शंका मोकळेपणाने मांडाव्यात, असे आवाहन करत आलेला पाहुणा ‘बाहेरचा’ न वाटता आपलाच वाटावा यासाठी संवाद महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. करिअर निवडताना कोणतेही काम लहान किंवा कमी लेखू नये, जे काम कराल ते सर्वोत्तम दर्जाचे व मनापासून करा, असा संदेश देताना त्यांनी आपल्या आजोबांनी दिलेला सल्ला तसेच स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रसंग सांगत जे काही कराल, त्यात सर्वोत्तम पाचांमध्ये तुमचे नाव असले पाहिजे, हा विचार आयुष्यात मार्गदर्शक ठरल्याचे स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोप करताना बसवराज पाटील नागराळकर म्हणाले विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन महत्त्वाचे आहे विद्यार्थ्यांनी भूतकाळात रममान होण्यापेक्षा वर्तमानात जगावे.आई-वडिलांना स्वाभिमान वाटावा, असे काम प्रत्येक युवकाने करावे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे उत्कृष्ठ ग्रंथालय वाचक, युवकमहोत्सवात सहभागी विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली कुलकर्णी आणि आसावरी आपसिंगेकर यांनी तर आभार आसिया पठाण या विद्यार्थिनीने मानले. विद्यार्थी कल्याण मंडळ उद्घाटन कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक-कर्मचारी यांची विशेष उपस्थिती होती.

# फुले महाविद्यालयात प्रा. डॉ. बळीराम पवार यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**किनगाव, ३० डिसेंबर :** अहमदपूर तालुक्यातील किनगांव येथील महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा डॉ बळीराम पवार हे वृक्षमित्र, विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित आंतरराष्ट्रीय किर्तीचे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. डॉ. बळीराम पवार यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन सक्षम सोसायटी राजस्थान च्या वतीने नुकताच आंतरराष्ट्रीय



जीवन गौरव पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले.

याबद्दल त्यांचा महाविद्यालयात श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम बोडके आणि प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. विठ्ठल चव्हाण, डॉ. अनंत सोमुसे, डॉ. प्रभाकर स्वामी, प्रा विष्णू पवार, प्रा. बालाजी आचार्य, प्रा संजय जगताप, डॉ. भारत भदाडे, डॉ. विरनाथ हुमनाबादे, डॉ. सदाशिव वरवटे, प्रा. विक्रम गायकवाड, प्रा. चंद्रमणी बनसोडे, प्रा सुनिल शिंदे, प्रा कृष्णा केंद्रे, डॉ. चेतन मुंढे, प्रा. सुमेध जोगदंड, डॉ. दर्शना कानवटे डॉ. मिरा शिंदे कार्यालयीन अधिक्षक गोपाळ इंद्राळे, अनिल भदाडे, कृष्णा धरणे आदी उपस्थित होते.

# ‘महाराष्ट्र उदयगिरी’त राष्ट्रीय गणित दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात मराठी विज्ञान परिषद व अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीरच्या वतीने राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अय्यर यांची १३८ वी जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. आणि राष्ट्रीय पातळीवर गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत ३६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला स्पर्धेत प्रथम लखनऊ विद्यापीठाची सुरभी त्रिपाठी, द्वितीय आरसी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूरची नेहा पवार, तृतीय नरसिंह माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय मुखेड ची तेजस दमकुंडवार यांनी. पारितोषिक प्राप्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस. एन. हल्लाळे, प्रा. डॉ.संजय शिंदे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. आर .बी. अल्लापुरे, सचिव डॉ. बी.डी करंडे, प्रा प्रशांत वाघमारे यांची उपस्थिती होती.



# केज भूमी अभिलेख कार्यालयाचा लिपिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० डिसेंबर**

सध्या प्रशासनात बहुतांश अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा लाचखोरीचा धुमाकूळ चालू असतानाच, शेत जमिनीच्या मोजणीची फाईल निकाली काढण्यासाठी शेतकऱ्यांकडून ३० हजार रुपयाच्या लाचेची मागणी करून, त्यातील १०,०००/- रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना केज येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका लिपिकाला जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी रंगेहात पकडले आसून. छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रांतर्गत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना व बीड यांनी ही कारवाई केल्याने बीड जिल्ह्यात पुन्हा खळबळ माजली आहे. याबाबतचा सविस्तर वृत्तांत असा की, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, केज, जि. बीड येथील लिपिक माणिक अण्णासाहेब वाघमारे वय ५० वर्षे याने तक्रारदार शेतकरी त्यांच्या जमिनीच्या हद्द कायम करून जमीन क्षेत्र मोजणीसाठी भूमी अभिलेख कार्यालय, केज येथे अर्ज केला होता. आरोपी लोकसेवक माणिक वाघमारे याने दि.१८.१२.२०२५ रोजी मोजणी केली होती. केलेल्या मोजणीनुसार क्षेत्राची घट न दाखवता फाईल निकाली काढण्याच्या मोबदल्यात आरोपीने तक्रारदाराकडे ३०,०००/-रुपये लाचेची मागणी केली. लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीनुसार सोमवारी दि. २९.१२.२०२५ रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान आरोपीने ३०,०००/-रुपयांच्या मागणीची पुष्टी केली. त्यापैकी ५,०००/-रुपये त्याने यापूर्वीच स्वीकारल्याचे मान्य केले.

उर्वरित २५,०००/- रुपयांपैकी १०,०००/- रुपयाचा एक हप्ता आज रोजी स्वीकारताना आरोपीला केज तहसील कार्यालयासमोर, केज-बीड रोडवरील एका चहाच्या टपरीसमोर सापळा रचून रंगे हात पकडण्यात आले आले. या वेळी आरोपीच्या अंगझडतीमध्ये लाचेची रक्कम १०,०००/- रुपये, इतर रोख ५,५००/- रूपये, मोबाईल व दोन अंगठ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. दरम्यान आरोपीच्या धाराशिव येथील निवासस्थानाची झडती घेण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पोलीस स्टेशन केज येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यत आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर श्रीमती माधुरी कांगणे, आणि अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिनगारे, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे (जालना), पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपअधीक्षक बाळु जाधवर (जालना), तपास अधिकारी पोलीस निरीक्षक, समाधान कवडे (बीड), पो.ह. गजानन घायवट, पो.ना. गजानन खरात, पो.अं. गजानन कांबळे, चालक विठ्ठल कापसे आदीच्या पथकाने केली. कोणत्याही शासकीय कामासाठी कोणीही लोकसेवक लाचेची मागणी करत असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १०६४ वर त्वरित संपर्क साधावा असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.



बीडमध्ये वटाण्याच्या शेंगा मोठ्या प्रमाणावर विक्रीस आल्या आहेत. ५० रूपये प्रति किलोप्रमाणे भाव असून नाविन्य म्हणून चवीसाठी वटाण्याची शेंग ग्राहक खरेदी करत आहेत.

# गजानन बँकेच्या वतीने केशर ऋण रक्षा निधी योजनेचे धनादेश वाटप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

श्री गजानन नागरी सहकारी बँकेने मयत पगारदार सभासद/ नाम मात्र सभासदांना केशर ऋण रक्षा निधी योजना सुरू केलेली आहे.


सदर योजनेद्वारे वसुलीस मदत होते व त्याद्वारे मयत काळे दीपक देविदास,वंजारे भीमराव बाबुराव व माने दत्तात्रय बाबुराव यांना केशर ऋण रक्षा निधीचे चेक बँकेचे चेअरमन तथा माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे हस्ते वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर.क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.शेख एम.एस., व्यवस्थापक विलास कुंबेफळकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# अंगणवाडी सेविकांच्या हक्कांसाठी राष्ट्रव्यापी पत्र व ज्ञापन आंदोलन

**भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शांत प्रकाशजी जाटव**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० डिसेंबर**

देशातील आंगनवाडी सेविकांना श्रमिक म्हणून वैधानिक मान्यता,किमान वेतन,सामाजिक सुरक्षा व पेन्शन यांसारखे मूलभूत हक्क मिळावेत,या मागणीसाठी दि.३१ डिसेंबर २०२५ पासून भारतीय जनता मज़दूर संघ यांच्या वतीने राष्ट्रव्यापी पत्र व ज्ञापन आंदोलन आयोजित करण्यात येणार आहे.हा उपक्रम औपचारिक किंवा प्रतीकात्मक नसून, संविधानिक अधिकार आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठीचा गंभीर लोकशाही प्रयत्न असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.देशभरातील सुमारे २७ लाख आंगनवाडी सेविका गेल्या अनेक दशकांपासून माता -बालकपोषण,सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक कल्याणाची जबाबदारी सातत्याने पार पाडत आहेत.मात्रआजही त्यांना श्रमिक दर्जा,किमान वेतन तसेच सामाजिक सुरक्षे पासून वंचित ठेवण्यात येत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.सर्वोच्च न्यायालयाने दीर्घकाळ नियमित व नियंत्रित स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ मानधनधारक स्वयंसेवक न मानता श्रमिक म्हणून मान्यता देण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली



असताना ही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शांत प्रकाश जाटव यांनी सांगितले की,या प्रश्नांच्या निराकरणाची अपेक्षा सध्याच्या सरकारकडूनच असून,संघर्षाची भूमिका न घेता संविधानिक व संवाद आधारित मार्गाने हा पत्र आंदोलन राबविण्यात येत आहे.

या आंदोलनाअंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय,श्रम व रोजगार मंत्रालय,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच माननीय पंतप्रधान यांना पत्र व ज्ञापन सादर करण्यात येणार आहेत. दबाव निर्माण करणे हा उद्देश नसून,धोरण,कायदा आणि प्रत्यक्ष परिस्थिती तील तफावत अधोरेखित करून सर्वोच्च न्यायालया च्या निर्देशांनुसार श्रम- सन्मान सुनिश्चित करण्या साठी सकारात्मक पावले उचलली जावीत,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, देशातील बौद्धिक वर्ग, शिक्षणतज्ज्ञ,धोरण विशेष तज्ञ आणि विचारवंत नागरिकांनी याविषयाकडे भावनिक नव्हे तर कायदेशीर,संविधानिक व नीतिगत दृष्टिकोनातून पाहून न्याय्य तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्रातही हे अभियान राबविण्यात येत असुन तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे.तरी सर्व अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस यांनी निवेदन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

## ३०५ एकर क्षेत्रात फळबाग लागवड कार्यक्रम

**हर्बालाईफ व फार्मसी फॉर फॉरेस्टचा पुढाकार कार्यक्रमासाठी १०५ कोटीचा निधी देणार**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढविण्याच्या उपक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. शासनाच्या शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा यासाठी हर्बालाईफ कंपनीने सामाजिक बांधिलकी उपक्रम अंतर्गत पुढाकार घेतला असून याला फामर्स फॉर फॉरेस्ट या संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या अंतर्गत जिल्हयात पडीक जमीन विकास तसेच वृक्ष लागवड आणि संवर्धन यासाठी ३०५ एकर वर फळबाग व देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी १.५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.

# गेवराई पंचायत समितीत सोबतच दोन दादा सामान्यांचे प्रश्न सोडण्याचा वादा

**बाळराजे पवार व युध्दाजित पंडित यांचा संयुक्त जनता दरबार ; अनेकांच्या प्रश्नांचा जागेवर निपटारा**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० डिसेंबर**

गेवराई पंचायत समितीच्या कारभाराबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने भाजप नेते बाळराजे पवार व युवा नेते युध्दाजित पंडित यांनी आज गेवराई पंचायत समिती कार्यालयातील सभागृहात संयुक्त जनता दरबाराचे आयोजन केले होते. या जनता दरबारात तालुक्यातील विविध गावांतील लाभार्थ्यांनी आपल्या अडचणी मांडल्या असता अनेक प्रश्नांचा जागेवरच निपटारा करण्यात आला.



घरकुल विभाग, नरेगा विभाग तसेच इतर शासकीय योजनांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून होणारी अडवणूक, कामांसाठी दलालांमार्फत होत असलेली वसुली याबाबत अनेक तक्रारी दोन्ही नेत्यांकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर हा जनता दरबार घेण्यात आला. यावेळी बाळराजे पवार व युध्दाजित पंडित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत कडक शब्दांत सुनावले तसेच पुढील बैठकीपर्यंत सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लागले पाहिजेत, अशी स्पष्ट तंबी दिली.

जनता दरबारादरम्यान अनेक घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणी तात्काळ सोडविण्यात आल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी बोलताना दोन्ही नेत्यांनी, यापुढे दर आठवड्याला पंचायत समिती कार्यालयात संयुक्त जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचा वादा केला. पंचायत समितीतील कोणत्याही विभागात जर कुठल्या सामान्य लाभार्थ्याची अडवणूक होत असेल, तर थेट आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या जनता दरबाराला गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, घरकुल विभागाचे अधिकारी सुनील थोरात यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच माजी जि.प. सदस्य पांडुरंग थडके, युवा नेते यशराज पंडित, माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, संदीप लगड, अमोल करांडे, कैलास माने यांच्यासह अनेक सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड नगर पालिकेच्या गटनेते पदी फारुक पटेल

**अजितदादांच्या नेतृत्वात शब्द पूर्ण करणारे प्रतिनिधी देऊ - आ. विजयसिंह पंडित**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**



बीड नगर पालिकेत ऐतिहासिक विजय मिळविल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाच्या नेतृत्वात शिव-शाहू-फुले आघाडीची स्थापना झाली असून राष्ट्रवादी सह बीड शहरातील समविचारी विजयी नगरसेवकांची ऐकी झाली असून नगर परिषदेत आघाडीकडून गटनेते म्हणून ज्येष्ठ नगरसेवक फारुक पटेल यांची निवड करण्यात आली. प्रचाराच्या दरम्यान मतदारांना आम्ही पक्ष म्हणून विजयानंतर विकासाचे शब्द दिले, नागरी समस्यांचे निराकरण करू असा शब्द आम्ही प्रभागनिहाय बैठका, सभांतून दिला होता. आज बीडकरांनी अजितदादांवर विश्वास ठेऊन पुरोगामी मतांची वज्रमुठ सिध्द केली आहे. दिलेले शब्द आणि आश्वासने पाळणारी आणि सामाजिक अभिसरण आणि विकासाचे समीकरण साधणारे प्रतिनिधी मंडळ आम्ही लोकांच्या सेवेत देणार आहोत असे आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले असून यावेळी त्यांनी फारुक पटेल यांचा सत्कार केला व उपस्थित विजयी नगरसेवक व पक्ष पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केज टाकळी शिव रस्ता मोकळा करुन दिल्याने शेतकरी झाले आनंदी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० डिसेंबर**



ग्रामीण भागातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे पाणंद रस्ते व शिव रस्ते हे मोकळे करण्यासाठी केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी अनेक गावात ही मोहिम राबवून अडथळा आणणाऱ्या शेतकऱ्यांना समजावून सांगत केज टाकळी हा शिव रस्ता सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी मोकळा करुन दिल्याने या रस्त्यावरील शेतकरी बांधव आनंदी झाल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र राज्याच्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या पावसाळी अधिवेशनात शेक-यांना येजा करण्यासाठी पाणंद रस्ते व शिव रस्ते मोकळे करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे नियोजन जाहीर केले, या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली होती. शासनाच्या या निर्णयाचे पालण करत केज तालुक्यातील टाकळी शिवारातील राज्यमार्गा पासुन दक्षिण उत्तर जात असलेला केज ते टाकळी हा शिव रस्ता सर्वे नंबर १०७,१०८ व केज शिवारातील सर्वे नंबर ४८ मधून शिव रस्ता पुढे चिंचोलीमाळी,नांदूर घाट रोडला जोडला जाणारा रस्ता हा गेल्या पन्नास वर्षापासून काही शेतक-यांनी या रस्त्याच्या आजबाजूने अतिक्रमण केल्याने हा रस्ता अरुंद झाल्याने या रस्त्यावरून जाणा-या व येणा-या

शेतक-यांना शेतात आपले वाहण घेऊन जाणे मोठे आवघड झाले होते.त्यामुळे या शिव रस्त्यावरील काही शेतक-यांनी शासनाने काही दिवसापूर्वी शिव रस्ता व पाणंद रस्ता संदर्भात काढलेला शासन निर्णय केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांना दाखवून हा शिव रस्ता शेतक-यांसाठी मोकळा करुन देण्याची मागणी केली होती.मंडळ अधिकारी व तलाठी यांनी या शिव रस्त्याचा पंचनामा करुन सदरील अहवाल हा केज तहसील कार्यालयात सादर केल्यानंतर केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार राकेश गिड्डे हे दि.२९ डिसेंबर सोमवार रोजी महसुलचे कर्मचारी व मंडळ अधिकारी भालेराव, तलाठी इनामदार यांना सोबत घेऊन शिव रस्त्याची पाहणी केली. यावेळी उपस्थित असलेल्या शेक-यांने शासन निर्णाची माहीती सांगून हा शिव रस्ता मोकळा करुन दिला.यावेळी टाकळीचे सरपंच आनंत घुले,ग्रा.प.सदस्य सुरेश घुले, शेतकरी रमाकांत बापू मुंडे, यांच्यासह अनेक शेतकरी यावेळी उपस्थित होते. हा शिव रस्ता मोकळा करुन दिल्याने या शिवरस्त्यावरील शेतक-यांना मोठा आनंद झाला.हा शिवरस्ता केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी मोकळा करुन दिल्याने त्यांचे भागातील शेतक-यांनी धन्यवाद मानले आहे.

# जिभेद्वारा उच्चारला जाणारा शब्द वरदानासह शापाचे ही कार्य करतो-साध्वी सुविधी म.सा.

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

बीड येथे चालू असलेल्या जैन धर्म आराधना प्रवचना मालेत तिसरे पुष्प गुंफताना पूज्य श्री सुविधाजी म. साहेबांनी आज उच्चारणार्या वाणीचे महत्त्व विषद केले. वाणी ही केवळ पंचेद्रियासह मानवालाच मिळते. व ही वाणीच माणसाची ओळख पटवते. म्हणून वाणी कशी असावी हे सांगताना त्यांनी सांगितले. जिभेद्वारा उच्चारला जाणारा शब्द शापासह वरदानाचेही काम पार पाडतो. उच्चारला जाणार शब्द हा शब्दच असतो, मात्र त्याच्या उच्चारणात अंतर पडतो. एका शब्दाने घाव होतो तर दुसर्या प्रकारातून तो घाव मिटवण्या मलमाचे कार्य करतो. अशी क्षमता ही तुमच्या उच्चारणार्या वाणीत आहे. आपला जीव हा पंच इन्द्रियधारी आहे. यामध्ये ही जीव्हा रसनेंद्रियासह वाणी उच्चारणे या दुहेरी कार्याला उपयुक्त आहे. जी क्षमता केवळ या मानवालाच लाभलेली आहे. द्वेष, राग, तिरस्कार, व्यक्त करणार्या शस्त्राचे तर दुभंगलेल्या मनाला दुखावलेल्या हृदयाला सांत्वना देण्याचे कार्यही याच जिभेला मिळालेले आहे, म्हणून शब्द उच्चारण्याची क्षमता हिच्यात जी आहे. याचाच परिणाम पाहता या वाणीमुळे कर्माचे बंधन होऊन ते पाप वृत्तीला कारणीभूत ठरते. व यातूनच कर्म निर्मूलनही करून पुण्य वृद्धी होते. याच शब्दातून मानवाला हीन-दीन, उच्च- निच्च संबोधले जाते. या जिभेची वैशिष्ट्यता ही अशी दिसून येते. इतर इंद्रिये दोन असून कार्य एकच करतात मात्र ही जीवा एकटी असून कार्य दोन प्रकारात करते. रस स्वादाने पचवणे तर शब्द उच्चारणाने ओळख करणे ही याची महत्त्वाची दोन वैशिष्ट्ये ठरतात .म्हणून तर तिच्या संरक्षणाला ३२ दाताची तटबंदी असून हेच इंद्रिय अशी असून तिला एकटीलाच कुठेही देहाच्या याच इंद्रियाला स्थानांतर अथवा बदलण्याची व्यवस्था नाही एवढी ही महत्त्वाची आहे. तिचे कार्य भिंतीप्रमाणे एकाच घरात माणसे जोडण्याचे. तर नदीवरील पुलाप्रमाणे सर्वांना जोडण्याचे आहे. एक अहंकाराने जगली जाते तर दुसरी माणुसकीतून सहिष्णूतेतून तारली जाते. एका वाणीतून महाभारत रामायण घडले जाते तर दुसर्या वाणीतून नैतिकतेच्या धड्यातून धर्माला जागवली जाते. अशा वाणीचा वापर करताना पाणी ज्याप्रमाणे शुद्ध करताना गाळले जाते तसेच वाणी उच्चारतानाही तिला ही चार पडद्यातून गाळून घ्यावे लागते. तरच आचरण शुद्ध बनते त्यासाठी पहिला पडदा कामाशिवाय अधिक न बोलण्याचा असतो. तो पिकाला देणार्या पाण्याच्या योग्य प्रमाणात ठरतो. कमी शब्दात विचार ठेवला तर हीच खरी किंमत होते. जास्त बोलण्यातून होतो भ्रतारणा कारण ते बोलताना तुमची तोंड आवरले जात नाही व त्याचा ऐकणार्यास कंटाळा येतो त्याने माणसाची किंमत राहत नाही जेवढे बोलायचे तेवढेच विचार करून बोलावे. दुसरी चाळणीही विचार करून पटणार्या शब्दाचीच उच्चारणात असावी. या शब्दातून तुमच्या इज्जतीची संस्काराची व खानदानाची ओळख पटते. तुमच्या जिभेवर नांदत असलेल्या सरस्वतीची अवहेलना होत नाही. शिवीगाळातून आपलीच प्रतारना होते म्हणून आपणास न आवडणार्या शब्द प्रयोगाची व विवेकाने बोलून तसे वागण्याची ही चाळणी असावी. तिसरी चाळणी ही सत्य वदनाची ठरावी एक असत्य झाकण्याला १०० खोट्याचा आधार घ्यावा लागतो, त्यासाठी सत्य वदनातून आपली किंमत राखली जावी आणि चौथ्या चाळणीतून वेळेनुसार बोलण्याची सवय ठेवावी. आनंदाच्या क्षणी दुःखाची शोकभावना कामाची नसती अशा प्रकारे जर वाणीचा वापर केला तर आपलीच किंमत कमी होत नाही. म्हणून जर योग्य प्रकारे वाणी या चारही पडद्यातून चाळून घेतली तर आपले जीवन सुधारल्याशिवाय राहत नाही हे सांगताना त्यांनी सांगितले. मुखातून निघालेला शब्द धणुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे परत फिरणारा नसतो म्हणून काळजीने आपण आपल्या वाणीचा वापर करावा हे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्ह्यात ३.५ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद

## जीवीत किंवा वित्त हानी नाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**

मंगळवारी सकाळी ५ वाजून ५५ मिनीटांनी जिल्ह्यात काही गावांमध्ये भूकंप झाला असून या भूकंपाची ३.५ रिश्टर स्केल नोंद झाली आहे. भूकंपाचे केंद्र वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसर आहे. या भूकंपाचे हादरे परिसरातील २० ते २५ गावांना जाणवले असून परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मागील चार ते पाच वर्षापासून वारंवार लहान मोठे भूकंप होत आहेत. याशिवाय भूगर्भातून आवाज येण्याचे प्रकारही वाढले आ–हेत. दरवेळी भूकंप झाल्यानंतर प्रशासनाकडून जनजागृती मोहीम राबवली जाते.

मंगळवार दि ३० डिसेंबर रोजी सकाळी ५ वाजून ५५ मिनीटांनी वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावातील गावकरी साखर झोपेत असतांना अचानक जमीन हादरली. यावेळी खिडक्या आणि दारे, टीनपत्रासह आवाज झाला. सुमारे चार ते पाच सेकंद हा आवाज होता. त्यामुळे गावकरी चांगलेच घाबरले. राष्ट्रीय भूकंपमापक केंद्रामध्ये या भूकंपाची नोंद झाली असून ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाल्याचे नोंद आहे. वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसर भूकंपाचे केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट झाले आहे. पांगरा शिंदे, वापटी, कुपटी, नांदापूर, बोल्डावाडी, रामेश्वरतांडा, दांडेगाव, कोपरवाडी, बोथी, सालापूर, डिग्रस बुद्रुक, पिंपळदरी, राजदरी, सिंदगी, सोनवाडी यासह परिसरातील काही गावांमधून भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपामुळे कुठेही जीवीत हानी किंवा वित्त हानी झाली नाही. वारंवार होणाऱ्या भूकंप व जमिनीतील आवाजामुळे परिसरातील नागरिक भितीच्या छायेत वावरत आहेत.

या भूकंपामुळे कुठेही आपत्ती झाली नसली तरीही परिसरातील गावांमधून पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी महसुल प्रशासनाला दिल्या आहेत.

# बालविवाहमुक्त भारत उपक्रमांतर्गत शाळा, अखंड हरिनाम सप्ताहामध्ये जनजागृती कार्यक्रम





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरप–लवार यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्या नियोजनानुसार जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत या उपक्रमांतर्गत हिंगोली तालुक्यातील समगा येथील पांडुरंग माध्यमिक विद्यालयात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाअंतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांकडून बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे व बाल संरक्षण अधिकारी (संस्थाबाह्य) जरीबखान पठाण यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम, संबंधित कायदेशीर तरतुदी तसेच मुला–मुलींच्या शिक्षण व आरोग्यावर होणारे परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे समुपदेशक अंकुर पाटोडे व केसवर्कर सुरज इंगळे उपस्थित होते. त्यांनी बालविवाहासंदर्भात तक्रार नोंदविण्यासाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या क्रमांकाची माहिती दिली तसेच गरजू बालकांना तत्काळ मदत उपलब्ध होऊ शकते, असे सांगितले. याप्रसंगी पांडुरंग माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एल. डी. नरवाडे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकवृंद, महिला कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून बालहक्कांचे संरक्षण, शिक्षणाचे महत्त्व व बालविवाहाविरुद्ध जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

हिंगोली येथील आनंद नगर व चंद्रश्लोक नगर येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद् भागवत कथा कार्यक्रमाच्या निमित्ताने बालविवाह मुक्त भारत या उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात उपस्थित भाविक भक्तांना जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम, बालकांचे हक्क तसेच बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. बालविवाहामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान याबाबत त्यांनी उपस्थितांना जागरूक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांकडून बालविवाह न करण्याची व बालविवाहास प्रतिबंध करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. समाजातून बालविवाह हद्दपार करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या जनजागृती कार्यक्रमास चाइल्ड हेल्पलाइन १०९८ चे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे, पर्यवेक्षक विकास लोणकर व राजरत्न पाईकराव उपस्थित होते. त्यांनी बालविवाह संदर्भातील तक्रार नोंदविण्यासाठी चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या क्रमांकाची माहिती देत गरजूंना तत्काळ मदत उपलब्ध होऊ शकते, असे सांगितले.

याकार्यक्रमामुळेभाविकांमध्ये बालविवाहाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण होऊन बालविवाहमुक्त समाज घडविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

# हिंगोलीत मराठवाडा साहित्य परिषदेचे कवीसंमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**



मराठवाडा साहित्य परिषद व तुळसाबाई सोमानी एज्युकेशनल ट्रस्ट, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने मसापचे मासिक कवी संमेलन तुळसाबाई सोमानी एज्युकेशनल ट्रस्ट हॉल येथे दिमाखात संपन्न झाले. प्राचार्य ज.मु. मंत्री, मसाप हिंगोलीचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, गजानन शिंदे, गोडाती काळे यांच्या पुढाकाराने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी नामदेवराव वाबळे व रतन आडे 'बाळतान्हा' उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रतन आडे यांनी, तर आभार प्रदर्शन गणेश येवले यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात अशोक अर्धापुरकर म्हणाले, कविता ही काळानुसार निरंतर बदलत जाते; मात्र तिचे मूळ तत्त्व कायम एकच राहते. कविता नेहमी समाजाच्या वेदना, संघर्ष आणि मन:स्थितीचे प्रामाणिक दर्शन घडवत असते. संमेलनातील कवींच्या सादरीकरणातून ग्रामीण वास्तव, शहरी एकाकीपणा, संघर्ष, निसर्ग, प्रेम, स्मृती आणि मानवी भावविश्वाच्या विविध छटा प्रभावीपणे प्रकट झाल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोडाती काळे, गजानन शिंदे, सुमन दुबे,संतोष ससे, राधिका देशमुख, अश्विनी देशमुख, वैशाली देशमुख, रघुनाथ पतंगे आदींचे मोलाचे योगदान लाभले. नवोदित व ज्येष्ठ कवींमध्ये सृजनशील संवाद साधत, साहित्यसंवर्धनाचा संदेश देत संमेलनाचा समारोप करण्यात आला.




**हिंगोली– मेरा युवा भारत कार्यक्रमांतर्गत येथील तालुका क्रिडा संकुलात मंगळवारी कबड्डी, खो–खो या सांघिक व मैदानी स्पर्धाचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी डॉ मुंडे, बांगर आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### भाजपचे हिम्मत राठोड यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



हिंगोली– भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव हिम्मत राठोड यांनी आज भाजपाला सोडचिठ्ठी देऊन वसमत येथे आमदार राजू नवघरे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत प्रवेश केला. यावेळी हिंगोली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अनिल पंतगे, रविंद्र गडदे, नगराध्यक्ष कैलास देशमुख, माजी नगराध्यक्ष राजू देशमुख, तालुका अध्यक्ष विकास शिंदे, विजय डोखळे, अशोक सिरामे, संतोष मुळे, संचित गुंडेवार, उमेश देशमुख, संदिप देशमुख, गजानन मानकर, सतिश टापरे आदी उपस्थित होते.

### लासीना येथे थ्री फेज वीज ८ तास द्या



हिंगोली– तालुक्यातील खानापूर फिटर अंतर्गत लासिना येथे ८ तास थ्री फेज लाईन व सकाळी ५ ते ८ वाजेपर्यंतची लोडशेडींग बंद करण्याची गावकऱ्यांच्या वतीने मागणी कार्यकारी अभियंता हिंगोली यांच्याकडे करण्यात आली आहे. लासिना येथे थ्री फेज लाईन चार तास सोडण्यात येत असून,त्यामध्ये लाइन येजा करते.यामुळे शेतातील पिकाचे पाण्या अभावी नुकसान होत आहे.शेतकऱ्याचे होणारे नुकसान टाळण्याकरिता पूर्वीप्रमाणे आठ तास थ्री फेज लाइन सोडन्यात यावी.त्याचबरोबर दररोज सकाळी ५ वाजतापासून ते ८ वाजेपर्यंत लाईन बंद ठेवण्यात येत आहे,याने १० वी व १२वी चे पेपर जवळ आले आहेत,सकाळी लाईन गेल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून,गावातील महिला वर्गांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे थ्री फेज लाईन ८ तास करावी व सकाळी ५ ते ८ वाजेपर्यंत सुरळीत लाइन ठेवावी.अन्यथा गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन गावकऱ्यांच्या वतीने पवन जाधव पाटील,कैलास कुबेरकर, कैलास जाधव,दत्तराव जाधव,जेजेराम जाधव,भागवत जाधव,अनिल जाधव यांनी दिले आहे.

# शहरातील मस्तानशहा नगरात आय लव महम्मदचे बॅनर




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**

शहरातील मस्तानशहा नगरात आय लव महम्मदचे बॅनर मोठ्या अक्षरात लावल्यामुळे खळबळ उडाली आहे. सदरील बॅनर कोणी लावले हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

मस्तानशहा नगरातील एका ठिकाणी मोठे बॅनर लावण्यात आले आहे. या बॅनरवर हम आखरी सास तक बोलते रहेंगे आय लव महम्मद इस नाम पर जिंदगी कुरबान है असा आशय लिहीण्यात आला आहे. हे बॅनर लावण्यामागे काय उद्देश आहे हे आणखी जरी समजले नसले तरीही हे बॅनर कोणी लावले हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

हिंगोली शहर शांतताप्रिय आणि सामाजिक ऐक्य टिकवणारे शहर आहे. शहरात सर्व सण, उत्सव सर्व समाजाचे लोक एकत्र येत साजरे करीत असतात परंतु या ठिकाणी मस्तानशहा नगरमध्ये अशा प्रकारचे बॅनर लावून काय सिध्द करायचे आहे हा एक प्रश्न आहे. अचानक लावण्यात आलेल्या बॅनरची सर्वत्र चर्चा होत आहे.

# नूतन पोलिस अधीक्षकांकडून कार्यालयीन कर्मचाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**

जिल्ह्याचे नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी मंगळवारी पोलिस अधीक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी कोणतीही फाईल पेंडींग न ठेवण्याचे आदेश दिले.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. या बदली प्रक्रियेच्या विरोधात त्यांनी मॅटमध्ये दाद मागितली आहे. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी ६ जानेवारी पर्यंत ठेवली आहे. बदलीनंतर नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी हिंगोली जिल्ह्याचा पदभार स्विकारला परंतु पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे हे मॅटमध्ये गेल्यामुळे त्यांना न्यायालयाने दिलासा दिला आहे. गृहमंत्रालयाने अचानक केलेल्या बदलीमुळे कोकाटे हे मॅटमध्ये गेले होते. त्यांच्या बदलीसंदर्भात दि ६ जानेवारीला न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत हिंगोली जिल्ह्यात दोन पोलिस अधीक्षक कार्यरत आहेत.

दरम्यान, नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी पदभार स्विकारताच विविध पोलिस ठाण्यांना भेटी देत पाहणी केली आहे. जिल्ह्यात अवैध धंदे बंद करण्याचे आदेश प्रत्येक पोलिस ठाणेदारांना दिले असून कायदा व सुव्यवस्थेचा आढावा दररोज धेतल्या जात आहे. पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी मंगळवारी येथील पोलिस मुख्यालयातील कारकून तसेच इतर संदर्भीत कर्मचाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना आदेश पाळण्याचे आवाहन केले तसेच कोणतीही फाईल पेंडींग न ठेवता दररोज फाईलवर स्वाक्षऱ्या घेण्याच्या सूचनाही दिल्या.

दरम्यान, जिल्ह्यात दोन पोलिस अधीक्षक असल्यामुळे पोलिस ठाणेदार व कर्मचारी यांच्यात चांगलीच तारांबळ उडाली असून गृहविभागाचे याकडे लक्ष नसल्यामुळे अशाप्रकारची परिस्थिती ओढवली आहे. या सर्व गोंधळात काही अधिकारी व कर्मचारी सुट्टीवर गेलयचे देखील विश्वसनीय सुत्रांनी सांगितले असून पोलिस विभागात पोलिस अधिकारी व कर्मचारी संभ्रमात सापडले आहेत. याबाबत लवकरात लवकर निर्णय व्हावा अशी अपेक्षा पोलिस विभागातील अधिकारी, कर्मचारी व्यक्त करीत आहेत.

# अनिल लोळेवार यांची राज्यस्तरीय शब्दकोडे स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांच्यावतीने शिक्षण संचालक राहुल रेखावार यांच्या संकल्पनेतून शिक्षकांसाठी ४२ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामधील शब्दकोडे सोडवणे ही विभागीय स्पर्धा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी (डायट)येथे दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केली होती. विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड,हिंगोली व परभणी अशा पाच जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथील शारीरिक शिक्षक तथा पर्यवेक्षक अनिल लोळेवार यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामुळे हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली तालुका शिक्षण विभाग व शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. या यशाबद्दल हिंगोली जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संदीपकुमार सोनटक्के यांनी पुष्पहार घालून यथोचित सत्कार केला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे, पर्यवेक्षक भारत शिंदे, नागनाथ सोळंके, अमोल कान्हेड, गजानन बांगर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# गोजेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रश्न लागला मार्गी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**



औंढा तालुक्यातील गोजेगाव येथे प्रा गजानन कुटे आयोजित भा ज पा संवाद बैठकीमध्ये उपकेंद्रामध्ये कर्मचारी राहत नसल्याबाबत गावातील ग्रामस्थांनी सामूहिकरीत्या तक्रार केली असता भाजपा शिक्षक आघाडी हिंगोली जिल्ह्याचे संयोजक प्रा गजानन कुटे यांनीही बाब उपजिल्हा आरोग्य अधिकारी रुणवाल यांच्या बाब निदर्शनास आल्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी डॉ गजानन चव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी मेश्राम यांनी नियुक्त कर्मचाऱ्यांना मुख्यालय राहण्याचे आदेश पारित केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तालुका आरोग्य अधिकारी डॉ गजानन चव्हाण यांनी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व त्यांच्या कामाविषयी माहिती देऊन सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालय राहण्याच्या सूचना केल्या. यावेळी उपकेंद्रातील अस्वच्छता, मुबलक औषध पुरवठा वरीष्ठ अधिकार्याचे मोबाईल क्रमांक दर्शनी भागावर लाऊन सुशासन व आरोग्य कर्मचाऱ्यांचे दायित्व यावर संगोपन चर्चा करून ग्रामस्थ व आरोग्य अधिकारी यांच्या समन्वयातून संवाद बैठक संपन्न झाली यावेळी सरपंच अच्युत नागरे, उपसरपंच सुभाषराव सांगळे, नामदेव घुगे, संजय सांगळे, अनिल सांगळे, सुभाष सांगळे सचिन सांगळे, कैलास सांगळे, भास्कर सांगळे, नामदेव खिल्लारे, केशव नागरे, अनिल सांगळे, बबन सांगळे, बाळू जायभाये यांच्यासह आरोग्य कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड शहरात शंभर मोहल्ला बैठका घेणार: अबिनाश कुमार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० डिसेंबर-**

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून, निवडणूक शांततेत पार पाडावी यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्याचबरोबर शहरात जवळपास शंभर मोहल्ला बैठका घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांची उपस्थिती होती.




नांदेड मनपा निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ रोजी मतमोजणी होणार आहे. दोनशे इमारतीमधील सहाशे मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. पोलीस प्रशासनाच्या वतीने वेगवेगळ्या पातळीवर विविध उपाययोजना करण्यात आल्या असून, यापूर्वीच्या गुन्ह्यातील गुन्हेगारांवर, अवैध धंदे करणार्‍यांवर जास्तीत जास्त प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर बीएनएसएस कलम १२६, १२८,१२९, १६३, १६८ प्रमाणे २७१ जणांवर, कलम ५५,५६,५७ अन्वये दोन जणांवर, तर १६३ अन्वये पाचशे जणांना तात्पुरते हद्दपार करण्यात येणार आहेत. हद्दपार करण्यात आलेल्यांना मतदानाच्या दिवशी सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत सूट देण्यात येणार आहे. मतदान शांततेत पार पडावे यासाठी नागरिकांच्या मोहल्ला बैठका घेण्यात येणार आहेत. या निवडणूका शांततेत पार पडण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने एक पोलीस अधीक्षक, दोन अप्पर पोलीस अधीक्षक, सात उपविभागीय पोलीस अधिकारी, २१ पोलीस निरीक्षक, १४८ पोलीस अधिकारी, एक हजार ४८३ पोलीस अंमलदार, १२ दंगा नियंत्रण पथक, २० स्ट्राईकींग,दोन राखीव पोलीस तुकड्या, तसेच एक हजार ३५० होमगार्ड असा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, कायदा हातात घेऊ नये, असे आवाहनही यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी केले.

### हुल्लडबाजी करणाऱ्यावर कारवाई

सध्या नांदेड शहरात महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू असून, नववर्षाच्या पूर्वसंध्येला पोलीस दलातर्फे शहर व ग्रामीण भागात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी, ड्रंक अँण्ड ड्राईव्ह केसेस व ब्रिथ ॲनालायझर तपासणी करण्यात येणार आहे. नववर्षाचे स्वागत शांततेत करावे, हुल्लडबाजी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देखील जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी दिला.

# सरसम परिसरात हरण ठार, शेतकऱ्यात भितीचे वातावरण

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ३० डिसेंबर-**



तालुक्यातील मौजे सरसम (बु.) येथील शेती शिवारात २९ डिसेंबरच्या मध्यरात्री बिबट्याने हरणाची शिकार केल्याची घटना घडली. हिमायतनगर तालुक्यात बिबट्याचे अनेक घटना घडत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे रात्रीच वेळी शेतकऱ्यांना शेतात पाणी देण्यासाठी जाणे धोकादायक झाले आहे.

या घटनेची माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी वन विभागाला कळविल्यानंतर आज दि ३० डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

मंगेश पाटील वनपरिक्षेत्र अधिकारी हिमायतनगर डी.डी. विभुते वनपाल सरसम विकास कांबळे वन मजूर वनमजुर सोने यांच्या नेतृत्वाखाली पंचनामा करण्यात आला. घटनास्थळी तपास करून संबंधित सरणावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या परिसरात बिबट्याची वावर वाढल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण वाढले असून परिसरात वन विभागाने गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## लोकसंवाद साहित्य संमेलनाचा पुरस्कार प्राध्यापक संतोष गिरी यांना जाहीर

**नांदेड** -शैक्षणिक क्षेत्रात सातत्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण व समाजाभिमुख कार्य केल्याबद्दल प्राध्यापक संतोष गिरी यांना लोकसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाचा प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून हा सन्मान देण्यात येत आहे. सन २०११ पासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्राध्यापक संतोष गिरी यांनी सुरुवातीला गिरी केमिस्ट्री क्लासेस या माध्यमातून अध्यापनाची सुरुवात केली. आज त्याच कार्याचा विस्तार गिरी पीसीएमबी क्लासेस या विश्वासार्ह शैक्षणिक संस्थेच्या रूपाने नांदेड शहरात झाला असून ही संस्था विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे एक प्रेरणास्थान ठरली आहे. गेल्या नऊ वर्षांपासून शेतकरी कुटुंबातील मुले केवळ आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत, या सामाजिक जाणीवेतून सातबारा दाखवा ५०% फी माफी हा उपक्रम त्यांनी सातत्याने राबवला आहे. तसेच भूमिहीन व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती देत शिक्षण सर्वांसाठी सुलभ करण्याचा प्रयत्न गिरी पीसीएमबी क्लासेसमध्ये केला जातो. आजपर्यंत साडेचार ते पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन देत त्यांच्या करिअरला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या क्लासेसने केले आहे. अनाथ तसेच सिंगल पेरेंट विद्यार्थ्यांसाठी विशेष सहानुभूतीपूर्ण धोरण राबवून शंभरहून अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन सावरण्यात संस्थेचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेणारे क्लासेस अशी वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या गिरी पीसीएमबी क्लासेसमध्ये रोज पढाई रोज परीक्षा या उपक्रमाद्वारे नियमित अभ्यास, चाचण्या व मूल्यमापनावर भर दिला जातो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी शिस्तबद्ध अभ्यासाच्या प्रवाहात राहतो. शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन यांचा समतोल साधणाऱ्या प्राध्यापक संतोष गिरी यांच्या कार्याचा गौरव म्हणजेच हा लोकसंवाद पुरस्कार असून शिक्षण क्षेत्रात या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## हृदयासाठी काळजी, आरोग्यासाठी बांधिलकी : डॉ. साईनाथ हिवराळे

**सगरोळी** -आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत कोणत्याही वयात हृदयविकार होण्याचे प्रमाण वाढले आहे. व्यायामाचा अभाव, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि जंक फूडच्या सवयींमुळे हृदयातील रक्तप्रवाहावर विपरीत परिणाम होतो. मात्र योग्य सवयी अंगीकारल्यास हृदय सशक्त ठेवता येते, असे प्रतिपादन डॉ. साईनाथ हिवराळे यांनी केले. कर्मयोगी बाबासाहेब देशमुख जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. २१ डिसेंबर रोजी संस्थेच्या केशव व्याख्यानमाले अंतर्गत आयोजित कार्यक्रमात ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त सुनील देशमुख, अपेक्षा हॉस्पिटलचे संचालक व संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. दिलीप फुगारे तसेच संस्थेचे सचिव डॉ. जयंत जकाते उपस्थित होते. सादरीकरणादरम्यान डॉ. हिवराळे यांनी हृदयाची रचना, कार्य, हृदयरोगांची लक्षणे व आधुनिक उपचारपद्धती यांची सविस्तर माहिती दिली. हृदयविकारांबाबत समाजात असलेल्या काही गैरसमजांवर त्यांनी स्पष्ट भाष्य करत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली. या सत्राला १०० हून अधिक नागरिक व कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.

# पालकांनी आपल्या पाल्यांना आदर्श नागरिक बनवावेत : विजयताई देशपांडे

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ३० डिसेंबर-**

पालकांनी आपल्या पाल्यांना शैक्षणिक ,सामाजिक जडणघडणीत मोलाचा सहभाग घेत आदर्श नागरिक घडवावेत असे मत विजयताई देशपांडे यांनी व्यक्त केले.

वै. भाऊसाहेब देशपांडे यांच्या आठव्या पुण्यस्मरण निमित्य आयोजित विद्यार्थी पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे तर प्रमुख अतिथी म्हणून ड मूरारजी देशपांडे ,मल्हारराव देशपांडे, प्राचार्य अशोक पंचगट्टे उपस्थित होते .प्रारंभी विद्या विकास विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या वै.भाऊसाहेब देशपांडे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमती विजयाताई देशपांडे म्हणाल्या की वै. भाऊसाहेब देशपांडे यांनी विद्या विकास विद्यालयाच्या लावलेल्या रोपट्यांचे रूपांतर विशाल वटवृक्षात झाले असून असंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रात चमकत आहेत .राजकीय ,शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात आघाडीवर आहेत. पालकांनी आपल्या पाल्यास केवळ शाळेच्या नावावर न सोडता आपणही त्याची प्रगती ,त्याची उपस्थिती,अभ्यास याची माहिती घेत त्याला योग्य ते वळण लावण्यासाठी शिक्षकांना हातभार लावावा .विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या मोहोजाळात न फसता



अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला .याप्रसंगी अँड. मुरारजी देशपांडे ,मल्हारराव देशपांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.शिरीष लव्हेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य अशोक पंचगट्टे उपप्राचार्य तानाजी दावलपुरे पर्यवेक्षक प्रशांत जोशी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सुना तलावात मुबलक प्रमाणात पाणी असूनही हजारो एकर शेतजमीन पाण्यावाचून बंजर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ३० डिसेंबर-**

तालुक्यातील मौजे वडगाव जहागीर येथील ५०० एकर शेत जमिनीवर सुना तलावाची उभारणी झाली असली तरी तलावात मुबलक प्रमाणात पाणी साठा असूनही शेतकऱ्यांच्या शेतीला मात्र रब्बी हंगामासाठी पाणी पाळी मिळत नसल्यामुळे हजारो हेक्टर शेतजमीन पाण्यावाचून वंजार झाली आहे परंतु याबाबतीत संबंधित लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकष्टाचा सामना करावा लागत आहे.

हिमायतनगर तालुक्यातील वडगाव जहागीर शिवारात असलेला सुना तलाव यंदा शंभर टक्के पूर्ण पाण्याने भरला आहे पूर्वी या तलावाअंतर्गत हजारो एकर शेत जमिनीवर शेतकऱ्यांना हरितक्रांतीचे स्वप्न साकार करता आले शेतकऱ्यांच्या शेतात दुहेरी पीक येऊन शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्याची जीवनमान आर्थिक उन्नतीने उंचावले होते परंतु गेल्या काही वर्षापासून या तलावाचा डावा कालवा गाळाने पूर्णता भरला असून गाळ काढण्याचा



कालावधी जवळ असला तरीही संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी कर्मचारी याकडे वेळोवेळी काही शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांना पाणी पाळी देण्याकरिता वरिष्ठाकडे पाणी पाळी मागण्याचे पत्र व्यवहार करूनही शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाणी पाळी मिळू शकली नाही त्यामुळे वडगाव जहागीर येथील सुदान शेतकरी जयप्रकाश हरिश्चंद्र ताडकुले यांनी जिल्हाधिकारी ,पाणीपुरवठा विभागाचे विभागीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आमदार, खासदार ,मंत्री याकडे पत्राद्वारे व्यवहार करू नये संबंधित तलावाचा डाव्या कालव्यातील गाळ उपसा करून पाणी पाणी मागणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी विनंती केली परंतु या बाबीकडे लघुपाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांनी काना डोळा करीत वेळोवेळी शेतकऱ्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवत शेतकऱ्यांची आर्थिक उन्नतीचा ऱ्यास केला तालुक्यातील सर्वात मोठा असलेला तलाव या तलावाला देखणी करण्यासाठी चॅनेल इन्स्पेक्टर किंवा इतर कर्मचारी कोणीही ढुंकून पाहत नाही परंतु या तलावावर अनेक धन दांडग्या शेतकऱ्यांनी स्वतःचे विद्युत पंप टाकून आपल्या शेती करिता रात्रंदिवस पाण्याचा उत्साह चालूच आहे परंतु डाव्या कालव्या अंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांना मात्र प्रशासन कॅनॉल मध्ये गाळ पूर्णता भरला आहे पाणी सोडता येत नाही याचे कारण पुढे करत डाव्या कालव्याची दुरुस्ती होत नसल्याने हजारो एकर शेत जमिनी पाण्यावाचून पडीत पडत आहेत धरण उशाला कोरड घशाला म्हणण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊन ठेपली आहे प्रशासनाचे या दुटप्पी धोरणामुळे येथील शेतकरी रसातळाला जात आहे तेव्हा वेळोवेळी कॅनल गाळ उपसा व दुरुस्ती करून उर्वरित शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी पाणी येण्यास योग्य तो उपाय करावा अशी विनंती आपल्या लेखी निवेदनाच्या आधारे जिल्हाधिकारी यांना शेतकरी जयप्रकाश हरिश्चंद्र ताडकुले राहणार वडगाव जहागीर यांनी केली आहे यांच्या मागणीकडे अनेक शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

# अंगणवाडी सेविकेचा भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्लीकडून सन्मान

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३० डिसेंबर-**

देगलूर तालुक्यातील सुजायतपूर येथील अंगणवाडी सेविका, कवयित्री, गीतकार व साहित्यिक सावित्रीताई आडकुते शेवाळकर यांना भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले राष्ट्रीय फेलोशिप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दिल्ली येथील पंचशील आश्रम, झेंडेवालान रिंग रोड येथे आयोजित ४१ व्या भारतीय दलित साहित्य संमेलनात,



देशातील २२ राज्यांतील साहित्यिक, पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अकादमीचे प्रमुख संघप्रिय गौतम, अध्यक्ष सुमनाक्षर यांच्या हस्ते सावित्रीताई यांना फेलोशिप प्रदान करण्यात आली.

सावित्रीताई आडकुते शेवाळकर या मागील अनेक वर्षांपासून कविता, गीत, लघुकथा व लेखन करत असून त्यांची प्रितसागर, फुलबाग, शिक्षणाचा झुला, अनामिक प्रित फुले ही साहित्यकृती प्रकाशित झालेली आहेत. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यात दलित चळवळीचे लेखन, महापुरुषांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे, उत्कृष्ट महिलांचा सन्मान, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, शैक्षणिक साहित्य वाटप, बौद्ध धर्म परिषद, महिलांसाठी मार्गदर्शन शिबिरे, आरोग्य शिबिरे तसेच किशोरवयीन मुलांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम असे अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले आहेत. साहित्य लेखनाच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. एक उत्कृष्ट अंगणवाडी सेविका म्हणून त्या कार्यरत असून जेतवन सामाजिक शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, सुजायतपूर या संस्थेच्या माध्यमातूनही त्या सामाजिक कार्य करीत आहेत. सावित्रीताई आडकुते शेवाळकर यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या वतीने सावित्रीबाई फुले राष्ट्रीय फेलोशिप प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास संघप्रिय गौतम, अध्यक्ष सुमनाक्षर, सचिव जय सुमनाक्षर, केंद्रीय मंत्री बबनराव घोलप, राज्यमंत्री यमनकुमार बावरा, पंजाबचे जिल्हाधिकारी अभिषेक मुन आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## वीर बाल दिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.२६ डिसेंबर, २०२५ रोजी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते वीर बालकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ.प्रकाश निहलानी, तसेच डॉ. अर्चना साबळे, डॉ. हनमंत फडेवार, डॉ. सतीशकुमार मेकेवाड, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा. कुलसचिव रवी मोहरीर यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी वीर बालकांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

# सांडपाणी-घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक शौचालयांची कामे पूर्ण करा : मयूर आंदेलवाड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० डिसेंबर-**

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच सार्वजनिक शौचालयांची कामे येत्या १० जानेवारी पूर्वी पूर्ण करून त्यासाठीचा उपलब्ध निधी पूर्णतः खर्च करण्यात यावा, असे निर्देश जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी दिले.

नायगाव पंचायत समिती सभागृहात आज ग्रामपंचायत अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस गट विकास अधिकारी पी. टी. वैष्णव, विस्तार अधिकारी पी. एस. जाधव, गणेश टोनगे, स्वच्छता तज्ञ विशाल कदम, समाजशास्त्रज्ञ महेंद्र वाठोरे, माहिती-शिक्षण व संवाद सल्लागार नंदलाल लोकडे तसेच गट समन्वयक दत्ता इंदूरकर उपस्थित होते.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी यावेळी नायगाव तालुक्यात सुरू असलेल्या सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच ग्रामीण भागातील ज्या कुटुंबांकडे अद्याप शौचालयांची सुविधा उपलब्ध नाही, अशा सर्व कुटुंबांना प्राधान्याने शौचालय उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. नायगाव तालुक्यात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची २५ गावांमधील कामे अद्याप अपूर्ण आहेत. यासोबतच सार्वजनिक शौचालयांची १५ कामे प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. गावांमध्ये शंभर टक्के शौचालय वापर, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, सेग्रीगेशन शेड, घनकचरा प्रक्रिया आदी स्वच्छताविषयक सर्व कामे पूर्ण करून गावे अधिक सक्षमपणे हागणदारीमुक्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व निकष पूर्ण करून १० जानेवारी पर्यंत गावे हागणदारीमुक्त अधिक घोषित होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहनही उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी यावेळी केले.

## आरोग्य तपासणीच्या माध्यमातून जोपासली सामाजिक बांधिलकी

**देगलूर** -अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. किशोर अतनुरकर यांनी आपल्या मातृसंस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेत असताना मिळालेल्या संस्कारांमुळे वैद्यकीय सेवेच्या पवित्र कार्याची संधी मिळाल्याची जाणीव ठेवत, त्यांनी स्वयंस्फूर्तपणे आपल्या संपूर्ण वैद्यकीय टीमसह महाविद्यालयातील मुलींची मोफत आरोग्य तपासणी केली. विद्यार्थ्यांच्या आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे असते. देगलूर शहर व परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना दिशा देणाऱ्या या महाविद्यालयासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढे येऊन आरोग्य, कला, क्रीडा आदी क्षेत्रांत योगदान द्यावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी विविध कार्यक्रमांतून केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. किशोर अतनुरकर यांनी या उपक्रमाची सुरुवात केली.

# सगरोळीत राज्यस्तरीय मुख्याध्यापक अधिवेशन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ३० डिसेंबर-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीत मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. बदलत्या शैक्षणिक पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी व आव्हानांची जाणीव करून देणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शिक्षण, व्यवसायाभिमुख व कौशल्याधारित शिक्षण, सैनिकी शिक्षण यांसारख्या नव्या क्षेत्रांची सर्वंकष माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे शाळा प्रमुखांचे महत्त्वाचे दायित्व ठरते. याच प्रक्रियेत मुख्याध्यापकांमधील नेतृत्व क्षमता ओळखणे व त्यांना योग्य दिशा देणे काळाची गरज बनली आहे.

या उद्देशाने सगरोळी (जि. नांदेड) येथील संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेने संस्थापक कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दिनांक २ व ३ जानेवारी रोजी सगरोळी येथेच संस्था संकुलात राज्यस्तरीय मुख्याध्यापकांचे अधिवेशन (EduVision Summit २०२५) आयोजित केले आहे. हे दोन दिवसीय अधिवेशन निवासी स्वरूपाचे असून यामध्ये विचारमंथन, तज्ज्ञ मार्गदर्शन व गटचर्चा यांच्या माध्यमातून शैक्षणिक नेतृत्व, नव्या संधी आणि धोरणात्मक दिशा यांवर सखोल चर्चा करण्यात येणार आहे. या अधिवेशनात अविनाश धर्माधिकारी (संचालक, चाणक्य मंडळ, पुणे), सेवानिवृत्त मेजर चंद्रसेन कुल्थे (अध्यक्ष, MKDEI, संभाजीनगर), मृगांक पांडे (प्राचार्य, माणिक पब्लिक स्कूल, माणिकनगर, बिदर), प्रा. डॉ. बालाजी चिरडे (सहयोगी प्राध्यापक, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा), पल्लवी कोष्टी (वरिष्ठ अधिकारी, लेंड अ हँड इंडिया, पुणे), शरद जाधव (विज्ञानाश्रम, पाबळ) यांसारख्या नामवंत तज्ज्ञांचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: संधी आणि आव्हाने, महाराष्ट्रातील सैनिकी शिक्षण, माध्यमिक शिक्षण, रोजगाराभिमुख तंत्र व व्यवसाय शिक्षण, ख युगातील शिक्षण क्षेत्रातील अत्यावश्यक कौशल्ये या विषयांवर मार्गदर्शन लाभणार आहे.

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी https://forms.gle/RJLEuqwdoCPRUM७ या लिंकद्वारे नोंदणी करून या महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय अधिवेशनात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी कैलास खासभागे (मो. ८३२९८२९५००) यांच्याशी संपर्क साधावा. या राज्यस्तरीय मुख्याध्यापकांच्या अधिवेशनामुळे शिक्षक व मुख्याध्यापकांच्या नेतृत्वक्षमतेला बळ मिळून गुणवत्ता विकासास चालना मिळेल तसेच एकंदरीत संपूर्ण शालेय व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यास मोलाची मदत होणार आहे.

### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकारःखरेदी

माहिती मिळाल्याचा दि.२३/१२/२५फेरफाराचा दि.२४/१२/२५लिहून देणारः सूभाष भास्करराव बिंदू रा.भोकर खाता क्र.९४३यांचे गट/सर्व्हे क्र.५५४लागवडीयोग्य क्षेत्र १.५३४३हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी सदरील गट क्र.५५४मध्ये प्लॉटींग असून ग्राम महसूल अधिकारी हे जायमोक्यावर जावून दि.१५/१२/२५ रोजी पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला करिता नोंद घेण्यात आली.मंजूरीस्तव सादर

लिहून घेणारःमहादाबाई जयवंता यलमलवाड (खाता क्र.११२९९) गट/सर्व्हे क्र.५५४ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.००००यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.११८१ दि.०५/०७/१४प्रमाणे रक्कम रुपये १०००००घेवून खरेदी दिली सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव ७/१२ वर दाखल केले.ज्या अर्थी तूमचा उक्त फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन/फेरफारच्या नोंदवहिवरुन वाटते ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**